रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २७५
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मुरुडमधील नांदगाव येथे आढळला शिलालेख/२
एपीएमसीत हापूस आंब्याचे दर आवाक्यात/६
सुधागडातील सोसायटी आदिवासीवाडीत रस्ता/७

## ‘स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांचे काम पूर्ण करा’



**मुंबई :** राज्यातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्राद्वारे (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन-एटीएस) केली जावी यासाठी राज्यात ५३ स्वयंचलित केंद्र उभारण्याचे काम प्रगतिपथावर असून ही कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीस परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव चेतन निकम, एआरएआय उपसंचालक मकरंद पाठक आदी उपस्थित होते. राज्यात सात एटीएस केंद्र पूर्ण झाली असून उर्वरित ३७ ऑगस्टअखेर कार्यान्वित होतील आणि प्रलंबित तपासणी केंद्राबाबत अन्य विभागाशी समन्वयाने कार्यवाही करून तातडीने ती सुरू करण्याबाबतचे नियोजन करावे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

# तरुणांसाठी भरीव कार्य करणार -कृष्णराज महाडिक

## युवाशक्ती जागर यात्रेचे महाडमध्ये जोरदार स्वागत





**महाड : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे गुरुवारी (दि.२३) युवाशक्ती जागर यात्रेदरम्यान महाड येथे जोरदार स्वागत करण्यात आले. येथील दौऱ्यात त्यांनी किल्ले रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊंच्या समाधीस्थळी नतमस्तक होऊन अभिवादन केले तसेच चवदार तळे येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून तरुणांसाठी भरीव कार्य करणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले.


मुंबईतून युवाशक्ती जागर यात्रेद्वारे पनवेल, पेण, पाली, माणगाव या ठिकाणच्या गाठीभेटी घेत युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक गुरुवारी सकाळी किल्ले रायगड येथे दाखल झाले. जिजाऊ व शिवरायांना अभिवादन करून त्यांनी आपल्या नियोजित दिनक्रमास प्रारंभ केला. यानंतर महाड येथे त्यांचे युवा मोर्चाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, भाजप महाड मंडळ अध्यक्ष निलेश देवगिरकर, युवा मोर्चाचे अध्यक्ष शुभम भावेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित मोरे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. मंजुषा कुद्रीमोती यांच्यासह पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. येथील शासकीय विश्रामगृहात प्रदेशाध्यक्षांनी युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

दरम्यान, चवदार तळे येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून प्रदेशाध्यक्ष महाडिक यांनी महाड नगरपालिकेला भेट दिली. तेथे त्यांनी सभापती सुमित पवार यांच्या दालनात त्यांचा व नगरसेवक सुरज बामणे यांचा सत्कार केला तसेच उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांचीदेखील भेट घेऊन महाड शहराचे प्रश्न जाणून घेतले.

आपल्या दौऱ्यात प्रदेशाध्यक्ष महाडिक यांनी पत्रकारांशी संवाद साधला. तरुणांच्या शैक्षणिक, क्रीडा तसेच रोजगारासंदर्भात बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडविणार असल्याचे सांगितले. महाडमधील रखडलेल्या क्रीडा संकुल व इतर शासकीय भरत्यांसंदर्भातही चर्चा करून न्याय देण्याचा प्रयत्न करीन, असे ते म्हणाले.

## ऑनलाइन गेमिंगसाठी १ मेपासून नवा कायदा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील वेगाने वाढणाऱ्या ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला नियमनात आणण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग ॲक्ट हा नवीन कायदा आगामी १ मेपासून संपूर्ण देशभर लागू होणार आहे.

या कायद्याचा उद्देश ऑनलाइन गेमिंग उद्योगाला ठोस चौकटीत आणणे आणि त्याचे संचालन अधिक पारदर्शक व सुरक्षित करणे हा आहे. यासाठी केंद्र सरकारने ऑनलाइन गेमिंग अथॉरिटी ऑफ इंडिया (ओजीएआय) नावाची नवी नियामक संस्था स्थापन केली आहे. या संस्थेचे नेतृत्व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अपर सचिवांकडे सोपविण्यात आले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही संस्था पैशांशी संबंधित आणि जोखमीच्या गेम्सवर विशेष लक्ष ठेवणार आहे. सर्व गेमिंग कंपन्यांना त्यांच्या गेम्सची नोंदणी ओजीएआयकडे करणे अनिवार्य असेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये तीन वर्षांपर्यंत कारावास आणि एक कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो तसेच परदेशातून चालवल्या जाणाऱ्या गेमिंग प्लॅटफॉर्मनाही या नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.

## पश्चिम बंगाल, तामिळनाडूत विक्रमी मतदान



**कोलकाता, चेन्नई : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी गुरुवारी (दि.२३) विक्रमी मतदानाची नोंद झाली. प. बंगालमध्ये पहिल्या टप्प्यासाठी सायंकाळी ५ वाजेपर्यंत १५२ मतदारसंघांमध्ये ८९.९३ टक्के मतदान झाले, तर तामिळनाडूमध्ये एकमेव टप्प्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत २३४ मतदारसंघांमध्ये ८४ टक्के मतदानाची नोंद झाली.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल असे मतदानाचे दोन टप्पे असून तामिळनाडूत २३ एप्रिलला एकाच टप्प्यात सर्व जागांसाठी मतदान प्रक्रिया झाली. दोन्ही राज्यांत काही ठिकाणी ईव्हीएम मशिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मतदानाची प्रक्रियेवर परिणाम दिसून आला.


दरम्यान, पश्चिम बंगालमधील दक्षिण मिदनापूर येथील कुमारगंज मतदारसंघातील भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात आसनसोल दक्षिण मतदारसंघातही भाजपच्या उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवर हल्ला झाला. याशिवाय अन्य काही ठिकाणी दगडफेक आणि मारहाणीच्या घटना घडल्या.

तमिळनाडूतील पुमपुहार मतदारसंघात एका मतदान केंद्रावर ड्युटीवर असलेल्या पोलिसावर चाकू हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी एका माजी सैनिकाला अटक करण्यात आली आहे.




**बारामती : येथील विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी मतदान प्रक्रिया झाली. यावेळी महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.**

## कर्नाटक सरकारकडून दहावीच्या गुणपत्रिकेतून ‘मराठी’ शब्दच गायब!




**बेळगाव : वृत्तसंस्था**

सीमाभागातील मराठी भाषिकांवर अन्याय करण्याची एकही संधी कर्नाटक सरकार सोडत नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. आता कर्नाटक माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या दहावीच्या निकालामधून “मराठी” हा शब्दच गायब करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

सीमाभागातील मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर जिथे विषयाचे नाव असणे आवश्यक आहे. तिथे ‘मराठी’ या शब्दाऐवजी फक्त रिक्त जागा सोडण्यात आली आहे. विषयाचे नाव न छापता केवळ त्यासमोर गुण नमूद करण्यात आले आहेत. हा तांत्रिक दोष नसून मराठी भाषेचे अस्तित्व पद्धतशीरपणे पुसून टाकण्याचा कर्नाटक सरकारचा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.

या प्रकारावर महाराष्ट्र एकीकरण युवा समितीचे अध्यक्ष शुभम शेळके यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे. ते म्हणाले की, कर्नाटक सरकारकडून सातत्याने मराठी भाषेची गळचेपी करण्याचा प्रयत्न होत आहे. निकालपत्रातून मराठी शब्द हटवणे हे मराठी माणसाच्या अस्मितेवर घाला घालण्यासारखे आहे, मात्र कितीही दडपशाही केली तरी सीमाभागातील मराठी भाषा आणि मराठी माणूस कधीही झुकणार नाही. आमची ही चळवळ ध्येय गाठल्याशिवाय थांबणार नाही.

## हरिहरेश्वर येथे आजपासून खगोल दर्शन महोत्सव



**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर येथे २४ ते २६ एप्रिलदरम्यान खगोल दर्शन महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने खगोलशास्त्राचा अनुभव प्रत्यक्ष स्वरूपात घेण्याची संधी सहभागींना मिळणार आहे.

आंतरराष्ट्रीय डार्क स्काय सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, ॲस्ट्रॉनइरा आणि डार्क स्काय इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. ॲस्ट्रॉनइराच्या संस्थापिका व संचालिका श्वेता कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून स्टारगेझिंग सत्रे आयोजित केली जाणार आहेत.

हरिहरेश्वर हे कोकणातील शांत, निसर्गरम्य आणि धार्मिक महत्त्व असलेले पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. समुद्रकिनारे, हिरवाईने नटलेले डोंगर आणि प्रसिद्ध हरिहरेश्वर मंदिरामुळे या ठिकाणाला ‘देवघर’ म्हणूनही ओळख आहे. मुंबईपासून सुमारे चार तासांच्या अंतरावर असलेले हे ठिकाण पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

या महोत्सवात आकाश निरीक्षण सत्रे, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खगोलविषयक संवादात्मक प्रदर्शने, प्रकाश प्रदूषणावरील माहितीपर कार्यक्रम तसेच डार्क स्काय संवर्धनाबाबत जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकाश प्रदूषणाचे दुष्परिणाम, नैसर्गिक अंधाराचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत सहभागींना मार्गदर्शन केले जाणार आहे.

या उपक्रमात खगोलप्रेमी, विद्यार्थी आणि पर्यटकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे. महोत्सवाच्या आयोजनासाठी पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे आदी सक्रिय आहेत.

### पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना

महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारचा खगोल व पर्यावरणविषयक महोत्सव आयोजित केला जात असून पर्यटन आणि विज्ञान यांची सांगड घालत पर्यटकांना वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पर्यावरणपूरक आणि अनुभवाधारित पर्यटनाला चालना देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे पर्यटन विभागाने स्पष्ट केले आहे.

## ‘टीसीएस’प्रकरणी दानिश शेखचा जामीन फेटाळला



**नाशिक : प्रतिनिधी**

टीसीएस कंपनीतील धर्मांतराचा प्रयत्न तसेच लैंगिग अत्याचारप्रकरणी अटकेत असलेला प्रमुख संशयित आरोपी दानिश एजाज शेख याचा अंतरिम जामीन जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावत अटकपूर्व जामिनासाठी पुढील सुनावणी २७ एप्रिल रोजी घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे दानिशचा कारागृहातील मुक्काम वाढला आहे.

जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. कटारे यांनी निकाल दिला. दानिश तसेच इतर सहा आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. फरार निदा खान हिचाही अंतरिम जामीन न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यानंतर दानिश यालाही न्यायालयाच्या निर्णयाने झटका बसला. या दोघांच्याही जामीन अर्जावर आता एकाच दिवशी सुनावणी होणार आहे.

## महाड, पोलादपूरमध्ये ‘अवकाळी’ सरी





**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागात महाड आणि पोलादपूर तालुक्यांमध्ये गुरुवारी (दि.२३) अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाल्याचे चित्र पहायला मिळाले.

तापमानाचा पारा वर सरकल्याने दुपारनंतर पावसाची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. त्यानुसार महाड शहरासह परिसरात गुरुवारी दुपारी साडेचार ते पाच या वेळेत अवकाळी पाऊस पडला.

पोलादपूरमध्येही अवकाळी पावसाने विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार हजेरी लावली. गेल्या अनेक दिवसांपासून प्रखर उन्हामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असून वातावरणात गारवा निर्माण झाला आहे, मात्र या पावसामुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांची तारांबळ उडाली.

या अवकाळी पावसाने सैनिक नगर आनंदनगर, गोकुळनगर, जाखमाता नगर बाजारपेठ तसेच पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील बाजारपेठ या भागांमध्ये झाड कोसळणे, फांद्या पडणे, घराच्या छपराचे पत्रे उडून जाणे असे प्रकार घडले. यावेळी सैनिक नगरमधील गणेश उतेकर यांच्या घराच्या छपराचे काँक्रीटचे पत्रे उडून नुकसान झाल्याचे दिसून आले.

## निवडक

### नाशिकमध्ये आणखी एका भोंदूचा महिलेवर अत्याचार

**नाशिक :** भोंदूगिरीच्या घटना नाशिक जिल्ह्यात थांबण्याचे नाव घेत नाहीत. अशोक खरात प्रकरण ताजे असतानाच आता निफाड तालुक्यातील धरणगाव (खडक) येथील एका भोंदूबाबाचा काळा कारनामा उघडकीस आला आहे. कौटुंबिक समस्या दूर करण्याचे आणि भूतबाधा उतरवण्याचे सांगत एका महिलेचे लैंगिक शोषण करणाऱ्या महेशगिरी महाराज उर्फ महेश दिलीप काकडे याच्यावर लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वणीच्या सप्तशृंगी मंदिरातील २२ किलो चांदीचा अपहार

**वणी :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तशृंगी गडावरील सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्टच्या कारभारातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंदिरातील नक्षीकामासाठी वापरण्यात आलेल्या चांदीमध्ये सुमारे २२ किलोची तफावत आढळली आहे. याबाबत नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाने चौकशीचे आदेश दिले आहेत.



# उद्योगस्नेही धोरणामुळे ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हब म्हणून महाराष्ट्राची ओळख -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन असून परदेशी गुंतवणूकदारांसाठी सर्वाधिक पसंतीचे राज्य आहे. राज्य शासनाच्या उद्योगस्नेही धोरणांमुळे जगभरातील कंपन्यांसाठी महाराष्ट्र 'ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हब' म्हणून उदयास येत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



भारतातील डेन्मार्कचे राजदूत रास्मुस अबिलगार्ड क्रिस्टेन्सेन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. या सदिच्छा भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी, बंदर विकास, शिपिंग, ऊर्जा आणि पाणी व्यवस्थापन या विषयांवर चर्चा करण्यात आली.या प्रसंगी राजदूत रास्मुस अबिलगार्ड क्रिस्टेन्सेन यांच्यासह फर्स्ट सेक्रेटरी (ट्रेड पॉलिसी अँड इकॉनॉमिक अफेअर्स) मॅथियास एमिल बेंग्टसन तसेच मानद डेन्मार्क वाणिज्य दूतावास, मुंबईचे उपमहावाणिज्यदूत कन्नन नटराजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाची माहिती डेन्मार्कच्या प्रतिनिधींना दिली. वाढवण बंदरामुळे महाराष्ट्र आणि देशाला जागतिक स्तरावर सागरी महासत्ता बनण्याची संधी मिळेल. तसेच लॉजिस्टिक्स आणि निर्यात वाढीस मोठे बळ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात जलवाहतूक व्यवस्थेला चालना देण्यासाठी महत्त्वाकांक्षी वॉटर टॅक्सी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी संपूर्ण प्रणाली विकसित करून प्रभावी नियंत्रण व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे. इलेक्ट्रिक फेरी आणि इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तंत्रज्ञानासाठी डेन्मार्कच्या आघाडीच्या कंपन्यांशी भागीदारी करण्यास राज्य शासन इच्छुक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

डेन्मार्कने त्यांच्या किनारी भागात आणि अल्प अंतराच्या फेरी सेवांमध्ये इलेक्ट्रिक तंत्रज्ञान यशस्वीपणे वापरले असून, अशा तंत्रज्ञानाचा मुंबईकोकण किनारपट्टीसाठीही मोठा उपयोग होऊ शकतो, असे डेन्मार्कचे राजदूत क्रिस्टेन्सेन यांनी सांगितले. तसेच डेन्मार्कच्या सुमारे ६० कंपन्या मुंबई व पुणे परिसरात उत्पादन, रिटेल, सेवा, शिपिंग आदी क्षेत्रांत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतडेन्मार्क ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप अंतर्गत, विशेषतः सागरी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य महत्त्वाचा भागीदार ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## चालत्या ट्रकमधून ९० हजारांचा ऐवज लुटणाऱ्या तीन जणांना अटक



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरती कळंबोली ते खालापूर टोल नाका यादरम्यान चालू गाडीतून ९० हजारांचा माल लुटणाऱ्या तिघांना खालापूर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून चोरलेला माल हस्तगत केला आहे.

या कारवाईत एक जण पोलीसांच्या हातावर तुरी देऊन सटकला. २१ तारखेच्या रात्री खालापूर पोलीस ठाण्याची पेट्रोलिंग व्हॅन मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे दरम्यान पेट्रोलिंग करत असताना मुंबईकडून पुण्याकडे जाणारी मारुती इको कार संशयितरित्या पोलिसांच्या नजरेस पडली. कारला सावरोली टोल नाक्याजवळ अडवून कागदपत्रांची विचारणा केली. वाहनातील इसमांनी उडवा उडवीची उत्तरे दिल्याने इको कारची तपासणी केली असता त्या कारमध्ये २५ किलो वजनाचे धातूच्या ३५ प्लेट असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.त्याची किंमत ८७, हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले पोलिसांनी कार व ३ जणांची कसून चौकशी केली असता एक अजब चोरीचा उलगडा झाला.

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरती कळंबोली ते खालापूर टोलनाका दरम्यान हे चोररस्त्यावरून जात असणाऱ्या एखाद्या ट्रकवर चढून त्यात असणाऱ्या किमती मालाची चोरी करत आणि विशेष म्हणजे चालू गाड्यांमधून हे चोर चोरी करत असत. अशाच एका ट्रक मधून २५ किलो वजनाच्या शिसे या धातूच्या ३५ प्लेट्स यांनी चोरल्या होत्या. जवळपास ८७ हजार ५०० रुपयांच्या या प्लेट्स चोरीबाबत खालापूर पोलीस ठाण्यात या तीन चोरांच्या विरोधात गुन्हा नोंदवला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार पुढील तपास करत आहेत.

## पोलादपूर येथे एक्टिव्हा दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवर एक्टिव्हा स्कूटर घसरल्याने तरुण गंभीर जखमी झाला. बुधवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातातील जखमी तरूणावर प्राथमिक उपचार करून त्याला पनवेल येथे रवाना केल्यानंतर वाटेतच नागोठणेदरम्यान तो मृत झाला



पोलादपूर तालुक्यातील महालगुर येथील जय धोंडू कदम हा कामानिमित्त एक्टिव्हा स्कूटर चालवित पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवरून जाताना स्कूटर घसरल्याने तरुण रोड डिव्हायडरवर आढळला. यामुळे त्याच्या डोक्याला खोलवर जखम होऊन रक्त वाहू लागल्याने तो अत्यवस्थ झाला. पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, पोलीस हवलदार संदीप कदम आणि पोलीस कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी तरुणाला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार करून पनवेल एमजीएम हॉस्पिटल येथे अधिक उपचारासाठी हलविले. मात्र, नागोठणेपर्यंत जखमीला रूग्णवाहिकेने नेले असता तो मृत झाल्याने त्याचा मृतदेह पुन्हा पोलादपूरला आणण्यात आला.

पोलादपूर सर्व्हिसरोड स्कायओव्हर ब्रिजचे काम सुरू असल्याने वाहनांची एकेरी वाहतूक अचानक पश्चिमेच्या सर्व्हिसरोडवरून सुरू झाल्याने वाहनचालकांची तारांबळ उडुन याठिकाणी अपघात होत आहे.

## श्रीवर्धनमध्ये स्कुटीवरून गोवंशीय मांस घेऊन जाताना आरोपीला अटक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन पोलिसांनी दिनांक २२ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजता श्रीवर्धन म्हसळा मार्गावरती गोवंशीय मासाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला रंगेहात पकडले आहे. श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा गोवंश मासाची विक्री होण्याची घटना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. या अगोदर देखील श्रीवर्धन मेटकर्णी येथील एका आरोपीला स्कुटी वरून गोवंश मांस घेऊन येताना पोलिसांनी पकडले होते. सदरचे मांस माणगाव तालुक्यातील मोरबा येथून आणल्याचे आरोपीने सांगितले आहे. म्हणजे माणगाव तालुक्यातील मोरबा येथे मोठ्या प्रमाणात गोवंशाची कत्तल केली जात आहे. मात्र या प्रकाराकडे पोलिसांचे सपशेलपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे.



जर का मोरबा गावात एवढ्या मोठ्या प्रमाणात गोवंशाची कत्तल होत असेल तर हे रायगड जिल्हा पोलिसांचे अपयशच म्हणावे लागेल. मागच्या घटनेतील देखील पकडलेले गोवंश मांस हे मोरबा येथूनच आणल्याचे पोलीस तपासात उघड झाले होते. राज्यात गोवंश हत्या बंदीचा कायदा लागू झाल्यापासून रायगड जिल्ह्यातील कर्जत, महाड, माणगाव त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुक्यात गोवंशाची कत्तल होत असल्याचे पाहायला मिळाले होते. तरी रायगडच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी याबाबत तातडीने कारवाई करावी अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

गोवंश वाहतूक केल्याप्रकरणी व जवळ बाळगल्या प्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२५ सह, महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९७६ चा सुधारणा कायदा २०१५ चे कलम ६,५,५(क) ९,९(अ) ११ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणी कृष्णहरी बालाजी कदम पोलीस (गोपनीय) श्रीवर्धन यांनी फिर्याद दिली असून ठाणे अंमलदार डी.सी. सरकटे यांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रदीप राठोड हे करीत आहेत. याप्रकरणी अझमततुल्ला अब्दुल रशीद नाडकर, वय ६० राहणार आराठी मोहल्ला, तालुका श्रीवर्धन, यास पोलिसांनी ताब्यात घेतले. सदर आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली होती

## मुरूडमधील नांदगाव येथे आढळला प्राचीन शिलालेख



**मुरूड : प्रतिनिधी**

चौदाव्या शतकातील राजा हंबीरराव यांचा दुर्मिळ शिलालेख रायगड जिल्ह्याच्या मुरूड तालुक्यातील नांदगाव येथे आढळला आहे. या ऐतिहासिक शिलालेखाचे वाचन इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील यांनी केले.

नांदगाव येथील भवानी पाखाडीचे रहिवासी असलेल्या जनार्दन चोरघे यांच्या नारळ-सुपारीच्या वाडीत हा शिलालेख आढळून आला. चोरघे कुटुंबियांच्या वाडीला जलसिंचन करण्यासाठी तेथे विहीर उपलब्ध आहे. इ.स. २०००च्या सुमारास विहिरीतील गाळ काढून विहीर स्वच्छ करीत असताना एक मोठी शिळा स्वच्छता करणाऱ्यांना दिसली. ती विहिरीतून बाहेर काढून ठेवण्यात आली. कित्येक वर्ष दुर्लक्षित असलेल्या या शिळेवरील बरीच अक्षरे व ओळी नष्ट झालेल्या आहेत.

आजमितीस राजा हंबीररावांचे किमान चार शिलालेख उपलब्ध असून नांदगावचा हा शिलालेख पाचवा आहे. त्याची लांबी व रूंदी अनुक्रमे ५६ इंच व २३ इंच आहे. याचे तीन भागात विभाजन केले असता वरच्या भागात चंद्र-सूर्य, मंगल कलश अशा आकृत्या काढलेल्या आहेत. मध्य भागात २३ ओळींचा लेख लिहिला असून अंत्य (खालील) भागात गाढव व स्त्रीचे संकरशिल्प कोरण्यात आले आहे.

शिळेवर लिहिलेला लेख हा देवनागरी लिपीतील असून त्यात काही प्रमाणात फारसी भाषेतील शब्दांचादेखील वापर केलेला आहे. लेखाच्या पहिल्या ओळीत हिजरी सन ७६९ आणि त्यापुढे शके १२८९, पळवंग संवत्सर नमूद केले आहे. म्हणजेच हा शिलालेख इसवी सन १३६७-६८मध्ये कोरण्यात आला आहे.

शिलालेखातील महत्त्वाची बाब म्हणजे लेखात नांदिगौ म्हणजे नांदगाव, मरूड म्हणजे मुरुड आणि चेउळ म्हणजे चौल या गावांचा उल्लेख आलेला आहे. शिलालेखात ठाणे कोंकण येथे राज्य करीत असणाऱ्या हंबीरराव या राजाचा उल्लेख "श्रीमत्य प्रौढिप्रताप चक्रवर्ती महाराजाधिराज" असा आढळतो, अशी माहिती इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील यांनी दिली.

या शिलालेखाचे वाचन अनिकेत पाटील यांनी केले असून जर्नल ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट या संशोधनपर मासिकात प्रकाशित केले आहे तसेच या ऐतिहासिक शिलालेखाचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे,

## महावितरण पनवेल विभागांतर्गत पावसाळ्यापूर्व दुरूस्तीची कामे सुरु

**पनवेलः रामप्रहर वृत्त**

ग्राहकांना चांगली सेवा व अखंडित वीजपुरवठा देणे महावितरणचा ध्येय असून पावसाळ्यात वीजपुरवठ्या मध्ये अडथळा निर्माण होऊ नये यासाठी महावितरणने पावसाळ्यापूर्वीच्या कामांना वेगात सुरुवात केली आहे.

त्यासाठी, प्रत्येक विभागात चक्राकार पद्धतीने काम होणार आहे. यंत्रसामग्री, विद्युत वाहक तारा यांच्या दुरुस्तीसह वृक्ष छाटणीची कामे हाती घेतली जात आहेत. त्या अनुषंगाने, पनवेल शहर विभागातील व एमआयडीसी तळोजा परिसरातील सर्व वीज ग्राहकांना सूचित करण्यात येते की १००/२२ केव्ही तळोजा अति उच्च दाब उपकेंद्र (EHV Substation) येथील २२ केव्ही बस सेक्शन-३ वरील जुन्या कळंबोली फिडरचा ब्रेकर बदलण्याचे तातडीचे तांत्रिक काम हाती घेण्यात आले आहे.

पनवेल अंतर्गत येणारे औद्योगिक व रहिवासी क्षेत्राचा वीजपुरवठा शुक्रवार, २४ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ०९:०० ते दुपारी १२:०० या वेळेत बंद राहणार आहे.

## पनवेल कल्चरल सेंटरची नवी कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटरचा 36वा वर्धापन दिन नुकताच पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या हॉलमध्ये झाला. याप्रसंगी संस्थेची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून नंदकुमार कर्वे यांनी मिलिंद गोखले यांच्याकडून सूत्रे स्वीकारली तर उपाध्यक्ष म्हणून स्नेहा सोमण आणि चंद्रकांत मने यांनी. याशिवाय कार्यवाहपदी सतीश गुणे, खजिनदारपदी मिलिंद मोघे आणि कार्याध्यक्षपदी शशिकांत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. तर मोहन हिंदुपूर, पद्मनाभ भागवत, वैशाली केतकर, पद्मजा कुलकर्णी, आनंद काटदरे हे कार्यकारिणी सदस्य असतील. याशिवाय संस्थेची जी पाच मुख्य कार्यक्षेत्रे आहेत त्यांच्या प्रमुखपदी संध्या घाडगे (संगीत), दीपक पवार (नाट्य), श्रीकला जोशी (नृत्य), अनिरुद्ध भातखंडे (साहित्य) आणि मिलिंद देशमुख (कला) यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या संगीत व कला विद्यालयाच्या प्राचार्या म्हणून मधुरा सोहनी कार्यभार सांभाळतील.

## अँन्टोनी गॅरेजेस प्रा.लि. कंपनी यार्डला आग, वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील चांवढोली गावानजिक असणाऱ्या अँन्टोनी गॅरेजेस प्रा.लि. कंपनीच्या यार्डला आग लागल्यामुळे कंपनीतील वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली असून दुपारच्या सुमारास कंपनीच्या यार्डमध्ये कोणत्यातरी कारणाने अचानक आग लागली. या आगीमध्ये अनेक गाड्यांचे सुमारे ३६ लाख रुपयांचे नूकसान झाले आहे.याबाबत प्रविण तुकाराम मुंढे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना शेळके अधिक तपास करीत आहेत.

## मोहोपाडा महावितरणच्या इमारतीचे नूतनीकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मोहोपाडा शाखेच्या इमारतीच्या नूतनीकरणाच्या अनुषंगाने महावितरणच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.



याप्रसंगी अधिक्षक अभियंता बिक्कड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद शिंदे, कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विभाग,संजय ठाकूर अतिरिक्त कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विभाग, राख साहेब उप कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण उप विभाग क्रमांक 2 तसेच मोहोपाडा शाखेचे सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत गलांडे पाटील, किरण चौधरी, विनय महाडिक , रेहमान अत्तार , कांबळे संतोष आणि कर्मचारी उपस्थित होते.

अद्ययावत इमारतीचे नूतनीकरण करून मोहोपाडा शाखेच्या पूर्ण परिसरात अखंडित वीज पुरवठा करण्याची ग्वाही देण्यात आली.

## कोपरखैरणे येथे उद्या कविसंमेलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोमसाप नवी मुंबई जिल्हा मंडळाची कोपरखैरणे शाखा व घणसोली शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कवी संमेलनाचे आयोजन शनिवार 25 एप्रिल रोजी संध्याकाळी 5 वाजता श्री गणेश नाईक सभागृह, ज्ञानविकास संस्थेचे विद्यालय, कोपरखैरने नवीमुंबई येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र शासनाचा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त जयश्री पाटील यांचा जाहीर सत्कार आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते होणार आहे. कोमसापच्या कार्यवाहक दिपा ठाणेकर, ऍड.पी सी पाटील, चंद्रकांत मढवी,मनोज म्हात्रे आणि कवी संमेलनाचे अध्यक्ष पुंडलिक म्हात्रे यांची उपस्थिती लाभणार आहे

## मान्सूनपूर्व तयारीला वेग; महाड विद्युत विभागाकडून व्यापक उपाययोजना सुरू

**महाड : प्रतिनिधी**

आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर महाड तालुका व शहरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महाड विद्युत विभागाने पूर्वतयारीला गती दिली आहे. धोकादायक ठरणाऱ्या वृक्षांच्या फांद्यांची छाटणी, जीर्ण व धोकादायक विद्युत खांबांची बदलणी तसेच रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर) देखभाल-दुरुस्ती, ऑइल बदलणे आदी कामांना सुरुवात करण्यात आली आहे.



मान्सूनदरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट होत असल्याने अनेकदा सुरक्षिततेच्या कारणास्तव वीजपुरवठा खंडित करावा लागतो. विशेषतः मोठ्या वृक्षांच्या फांद्या तुटून मुख्य वाहक तारांवर पडल्यास शॉर्टसर्किट होऊन आग लागण्याचा धोका निर्माण होतो. अशा वेळी जवळच रोहित्र असल्यास स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर संभाव्य धोके टाळण्यासाठी विभागाने ही उपाययोजना हाती घेतली आहे.

सध्या शहरातील चवदार तळे परिसरात कामांना प्रारंभ झाला असून पुढील टप्प्यात प्रभात कॉलनी, नवेनगर तसेच इतर भागांमध्येही ही मोहीम राबविण्यात येणार आहे. पावसाळ्यापूर्वीच धोकादायक परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जात आहे.

अलीकडेच चवदार तळे परिसरात झाडाच्या फांदीचा विद्युत तारेस स्पर्श झाल्याने आग लागल्याची घटना घडली होती. मात्र महाड अग्निशमन दल व विद्युत कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे ती वेळेत नियंत्रणात आली. त्याचप्रमाणे काही दिवसांपूर्वी महाड एमआयडीसीकडून शहराला वीजपुरवठा करणारी उच्च दाब विद्युत वाहक तार तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता; मात्र कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर दुरुस्ती करून सेवा सुरळीत केली होती. एक दिवसापूर्वी देखील अशीच घटना घडल्यानंतर तत्परतेने वीज कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य निभावले होते.

महाड तालुक्याचा डोंगराळ व दुर्गम भौगोलिक परिसर लक्षात घेता वीजपुरवठा सुरळीत राखणे हे मोठे आव्हान असते.

## निवडक

### देशी दारू हस्तगत

**पनवेल :** देशी दारू विक्रीप्रकरणी खारघर पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला आहे. पदु आल्या घरत (वय 71 राहणार मुरबी गाव) यांच्याकडे देशी दारूचा माल विनापरवाना विक्री करण्यासाठी सापडून आला. त्यामुळे त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

### इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.दिपक साहेबा घुमरे (42 रा.करंजाडे) असे या इसमाचे नाव असून उंची अंदाजे 5 फुट 8 इंच, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा मध्यम असून अंगात टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. त्याला मराठी व हींदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.हवा.देवेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

### मोबाईल, लॅपटॉपची चोरी

**नवीन पनवेल :** सेक्टर १२, कळंबोली येथील घरात प्रवेश करून चोराने मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेले. या प्रकरणी २२ एप्रिल रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सौरभ सिंग हे सेक्टर १२, कळंबोली येथे राहत असून २२ एप्रिल रोजी त्यांच्या घरात आरोपीने प्रवेश केला आणि घरातील २६ हजार रुपये किमतीचे ४ मोबाईल, १५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेले.

### ५२ बॅटऱ्यांची चोरी

**नवीन बनवेल :** बॅटरी रूममधून ५२ बॅटऱ्यांची चोरी केल्याप्रकरणी अमित सेवेन्द्र त्रिपाठी आणि सुरेश तिवारी (दोघेही राहणार मध्य प्रदेश) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ए एम एल एफ ट्रान्सपोर्ट, पार्किंग यार्ड, कोन फाटा येथे सिक्युरिटी गार्ड अमित त्रिपाठी याच्या ताब्यात एक लाख तीस हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या कंपनीच्या मालकाने दिल्या होत्या. यावेळी अमित आणि त्याचा मित्र सुरेश तिवारी यांनी संगनमत करून पार्किंग यार्ड मधून बॅटऱ्या चोरून नेल्या.

### सोन्याची चेन खेचली

**नवीन पनवेल :** चाकूचा धाक दाखवून सतरा ग्राम वजनाची सोन्याची चेन जबरीने खेचून चोरी केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २२ एप्रिल रोजी करण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. २२ एप्रिल रोजी पनवेल बाजूने नवीन पनवेल कडे जाताना रेल्वे क्रॉसिंग ब्रिजच्या खालील बोगद्यामध्ये संतोष गुप्ता (राहणार सेक्टर १३, नवीन पनवेल) हे पल्सर मोटरसायकल वरून आले. यावेळी दुसऱ्या मोटरसायकल वरून आलेल्या तीन अनोळखी इस्मानी त्यांना अडवले आणि चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून चोरी करून ते निघून गेले.

### महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**पनवेल :** एका महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करून त्यांच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर महिला या पळस्पे फाटा येथील एका बॅटरीच्या दुकानासमोर गाडीची बॅटरी चेक करण्यासाठी थांबल्या असताना बॅटरी दुकानदार याने बॅटरी चेक करून बॅटरी खराब झाली आहे. मी फुकट नवीन बॅटरी घेवून देतो असे बोलून त्याने सदर महिलेच्या डाव्या हाताला स्पर्श केला व जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याने त्याच्या मनात लज्ञा उत्पन्न झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जुगारावर पोलिसांची धाड

**नवीन पनवेल :** सेक्टर 7, खारघर येथील जुगाराच्या अड्ड्यावर धाड टाकत दहा जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 20 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 20 एप्रिल रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास पाईपलाईन शेजारील झोपडपट्टी परिसरात असलेल्या कच्च्या कापडाच्या शेडमध्ये सेक्टर सात, खारघर येथे आरोपी गुरुनाथ पांडुरंग मोडेकर (कोपरा गाव) आणि जगदीश गोपीनाथ ठाकूर (कोपरा गाव) हे जुगार अड्डा चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला आणि दहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

# कामोठे प्रभागात अतिक्रमणविरोधी विभागाची अनधिकृत नर्सरी आणि विक्रेत्यांवर तोडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**



कामोठे प्रभाग समिती 'क मार्फत अनधिकृत अतिक्रमण व फेरीवाले यांच्यावर व्यापक स्वरूपात धडक कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार करण्यात आलेल्या या कारवाईत विविध ठिकाणांवरील अनधिकृत स्टॉल, नर्सरी, फेरीवाले व हातगाड्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले तसेच काही ठिकाणी झोपड्या हटविण्यात आल्या.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून त्यानूसार कामोठे सेक्टर 19 मधील मारुती स्वीट व चेतक स्वीट परिसरातील अनधिकृत स्टॉलवर कारवाई करून सिलेंडर, शेगडी व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच सेक्टर 7 येथील एमएनआर स्कूल चौकात अनधिकृत फळ विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. कामोठे पोलीस स्टेशन समोर फेरीवाल्यांवरही कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. याचबरोबर सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने व प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी सेक्टर 19, 25, अक्षर बिल्डिंग परिसर, खान्देश्वर स्टेशन, सेक्टर 21 व सेक्टर 34 येथे अनधिकृत व विनापरवाना नर्सरींवर कारवाई करून संबंधित झोपड्या तोडण्यात आल्या. तसेच खान्देश्वर स्टेशन परिसरात अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले.

सेक्टर 21 येथे दोन नर्सरींसह भंगार व सायकल विक्रेत्यांच्या झोपड्यांवर कारवाई करण्यात आली. सेक्टर 34 येथे अनधिकृत हातगाडी हटविण्यात आली. तसेच नीलकंठ स्वीट परिसरात अनधिकृत नारळ विक्रेत्यावर कारवाई करण्यात आली. अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उचलला असून यापुढेही अनधिकृत व्यवसायधारकांवर अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे. प्रभाग समिती 'ड' मार्फत नविन पनवेल परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. या कारवाईत सेक्टर 3 येथील अनधिकृत भाजी व फळ विक्रेत्यांकडून माल जप्त करण्यात आला. तसेच सेक्टर 2 व शिवा कॉम्प्लेक्स परिसरातील अनधिकृतरित्या विक्री करणाऱ्या चिकन विक्रेत्यांचे साहित्यही जप्त करण्यात आले.

याशिवाय ब्रिजवासी बिकानेर स्वीट येथील सिलेंडर व काउंटर जप्त करून फुटपाथवरील अनधिकृत फळ विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात आली. विचुंबे रोड येथे बसलेल्या फुटपाथवरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई करून जप्त केलेले कांदे व बटाटे गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले आहेत.

सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने यांच्या उपस्थितीत अतिक्रमण पथकाच्या मार्फतही कारवाई करण्यात आली.

## प्रभाग समिती 'अ' खारघर अंतर्गत हॉटेल्सच्या अनधिकृत शेडवर हातोडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार प्रभाग समिती 'अ मार्फत आज दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी खारघर परिसरातील जेजे रसोई बार, अचिजा हॉटेल, एल ताकोस, ब्लू टोकाई, कॉपी रोसष्टर्स, पानाश कॅफे, बाईकरस ब्रेवीस कॅफे, कोटीयार्ड कॅफे अशा विविध हॉटेल्स बाहेरीलअनधिकृत शेडवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून तोडक कारवाई करण्यात आली.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून त्यानूसार चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू आहे. खारघर मधील काही हॉटेल्सच्या बाहेर अनधिकृतरित्या शेड उभारण्यात आले होते, महापालिकेच्यावतीने अनेकवेळेला सूचना देऊनही या हॉटेल्सनी हे शेड काढले नव्हते, शेवटी प्रभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर तसेच प्रभारी अधीक्षक जितेंद्र मढवी यांच्या उपस्थितीत अतिक्रमण विभागाच्यावतीने जेसीबीच्या साह्याने ही तोडक कारवाई करण्यात आली.

## भाजप युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष महाडिक यांची अनिमेष ओझे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**पनवेल : वार्ताहर**

भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचा प्रदेश दौरा सुरू आहे. त्यांच्या उपस्थितीत काल आणि आज उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाच्या वतीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले. आज सकाळी त्यांनी युवा मोर्चाचे पनवेल शहर सरचिटणीस अनिमेष ओझे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

त्यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजीत पाटील, भाजपा पनवेल अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे,रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, प्रीतम म्हात्रे, प्रशांत शेटे, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा, नगरसेविका शिवानी घरत, अस्मिता घरत यांच्या सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.



## भेंडखळ येथील कॉनएक्स गोदामाला भीषण आग

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील कोप्रोली - भेंडखळ महामार्गावरील कॉनएक्स गोदामाला काल २३ एप्रिल रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.सुदैवाने या आगीच्या दुर्घटनेत जीवित हानी झाली नसल्याची माहिती मिळाली असून, गोदामात निर्यातीसाठी आलेल्या मालाचे जळून मोठे नुकसान झाले आहे.आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि सिव्हिल डिफेन्सच्या पथकांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली.

अग्निशमन दलाच्या जवानांनी आग अधिक पसरण्यापासून रोकण्यासाठी शर्थीच्या प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र आगीचे नेमके कारण काय ? हे अद्याप समजू शकले नाही.शॉर्टसर्किट ही आग लागली असल्याचा प्रार्थमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. मागील चार दिवसापूर्वी गव्हाणफाटा येथील जे डब्लू आर या गोदामाला मोठ्या प्रमाणात आग लागली होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसातच दुसरी आगीची दुर्घटना घडल्याने या परिसरातील गोदामांच्या व्यवस्थापनाबद्दल शशांगता व्यक्त करण्यात येत असून,गोदामातील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याची बाब समोर येत आहे.

उरण तालुक्यातील जेएनपीए अनुषंगाने अनेक बेकायदेशीर गोदामे थाटण्यात आली आहे. त्या बहुतेक गोदामांच्या ठिकाणी आग विझवण्याच्या साधनाचा अभाव दिसून येत आहे. गोदामातील वाहनांची पार्किंग, सर्रास रस्त्यावर थाटण्यात आल्याचे सर्वत्र दिसत आहे. तर गोदामातील वाहने पार्किंगच्या ठिकाणी भाड्याच्या हव्यासापोटी शेकडो कंटेनर ठेवले जात आहेत. यावर प्रशासनाने तात्काळ कारवाई केल्यास अशा प्रकाचे अपघात कमी होण्याला मदत होईल

## पनवेल कल्चरल सेंटरच्या वर्धापनदिनी हृषिकेश जोशी यांच्याशी दिलखुलास गप्पा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटरचा 36 वा वर्धापन दिन नुकताच पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या हॉलमध्ये दोन सत्रात उत्साहात संपन्न झाला. सकाळच्या सत्रात आजचा आघाडीचा आणि लोकप्रिय हार्मोनियम वादक तन्मय देवचके आणि त्यांच्या पाच सहकारी वादकांनी मिळून 'सृजन - रागदारी : फोक ते फ्युजन' हा कार्यक्रम अप्रतिमरित्या सादर करुन अडीच तास रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. हार्मोनियम, कीबोर्ड, गिटार, तबला, पखवाज आणि मंजिरी यांच्या साथीने तन्मयने जुन्या-नव्याचा संगम साधत, राग चारुकेशी, रामधून, सुंदर ते ध्यान हा अभंग, राग पिलू व स्वतःच्या काही रचना आपल्या हार्मोनियम वादनातून अतिशय तयारीने सादर केल्या. वादनाबरोबरच गायनही करून, आपल्याबरोबर रसिकांनाही गायला लावून कार्यक्रमात एक वेगळाच रंग भरताना मैफल एक उंचीवर आणून सोडली. भैरवीने मैफलीची सांगता झाली.

दुसऱ्या सत्रात, संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथक नृत्यस्पर्धेत तीन वयोगटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या क्षितिजा बाम, अनुष्का परुळेकर व तेजस्विनी झवेरी या तिघींनी स्वतंत्र कथक नृत्याविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यानंतर अनेक वर्षे निरलसपणे विद्यादान करणारे तरीही प्रसिद्धीपासून दूर राहिलेले गानगुरु बाबादास तुपे यांचा संस्थेतर्फे शाल-श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून नंदकुमार कर्वे यांचे पदग्रहण झाले. मावळते अध्यक्ष मिलिंद गोखले व नूतन अध्यक्ष नंदकुमार कर्वे या दोघांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुप्रसिद्ध अभिनेता, दिग्दर्शक व लेखक हृषिकेश जोशीं यांचे हस्ते संस्थेच्या 'संवाद' या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. यानंतर एबीपी माझाचे वृत्तनिवेदक दीपक पळसुले यांनी हृषिकेश जोशी यांची जाहीर मुलाखत घेतली. यात कोल्हापुरातील शालेय शिक्षणापासून दिल्लीत एनएसस्डीतील अभिनय प्रशिक्षण व त्यानंतर प्रत्यक्ष मुंबईत कलाकार म्हणून आजपर्यंत सुरु असलेला दीर्घ प्रवास त्यांनी उलगडून दाखवला.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विशेष उपक्रम ; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेमार्फत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे पर्यावरणविषयक विशेष उपक्रमाचे आयोजन दिनांक २३ एप्रिल रोजी करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमामध्ये पर्यावरण विषयावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात निबंध लेखन, पोस्टर निर्मिती, प्रश्नमंजुषा स्पर्धेचा समावेश होता. तसेच यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. याचबरोबर पर्यावरणविषयक शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित उपक्रमांविषयी जनजागृती निर्माण करणे हा होता. याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव दृढ करण्यासाठी वृक्षारोपणासारखे उपक्रमही यावेळी राबविण्यात आले. याच पध्दतीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी सांगितले आहे.

या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या निशा नायर, शिक्षिका नमिता अखौरी, महापालिकेचे अधिकारी, शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इंटरॲक्टिव्ह लँग्वेज लॅबला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दि. 22 एप्रिल 2026 या दिवशी शैक्षणिक भेटी अंतर्गत सीकेटी सीनियर कॉलेज, न्यु पनवेल येथील इंटरॲक्टिव्ह लँग्वेज लॅबला नेण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय इंग्रजी दिवसाचे औचित्य साधून या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना आधुनिक भाषा शिक्षण पध्दती, उच्चार सुधारणा, श्रवण व संभाषण कौशल्यांचा सराव तसेच डिजिटल माध्यमांचा वापर यांची माहिती देण्यात आली. लँग्वेज लॅबमधील प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान अधिक प्रभावीपणे आत्मसात करता आले. प्राचार्य निशा नायार यांचे मार्गदर्शन लाभले.



## फुंडे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ई-संमेलनात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**

उद्योजकता आणि व्यवस्थापनातील उदयोन्मुख प्रवाह या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय ई-संमेलन अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. हे संमेलन अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे, उरण, कला व वाणिज्य महाविद्यालय, खारेपाटण, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग आणि अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात उद्घाटन समारंभाने करण्यात आली. यामध्ये देश-विदेशातील मान्यवर, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.डॉ. साजिद शेख यांनी संमेलनाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, व्यवस्थापन क्षेत्रात नव्या प्रवाहांची ओळख करून देणे व संशोधनाला चालना देणे हे या उपक्रमाचे प्रमुख ध्येय असल्याचे प्रस्ताविकात म्हटले असून, त्यांनी विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावरील संधींचा लाभ घ्यावा असेही आवाहन केले.तर डॉ वाल्मिक सरवदे यांनी डिजिटल युगातील व्यवस्थापनाचे बदलते स्वरूप स्पष्ट केले.

त्यांनी उद्योजकतेत नवकल्पना आणि संशोधन यांचे महत्त्व अधोरेखित करत जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कौशल्यविकास आवश्यक असल्याचे नमूद केले.

## संपादकीय

# गर्जा जयजयकार क्रांतीचा

क्रांती कधीच जादूच्या कांडीप्रमाणे एका रात्रीत होत नाही, असे पूर्वी म्हटले जात असे. आता ही म्हण इतिहासजमा झाली आहे. क्रांतीची वाटचाल संथपणाकडून झंझावाताच्या वेगाने सुरू आहे.

**महाराष्ट्र एका ऐतिहासिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे, आणि एका नव्या क्रांतीची चाहूल महाराष्ट्राला लागली आहे. बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत खुद्द मुख्यमंत्र्यांनीच या परिवर्तनाचा पहिला उच्चार केला, आणि महाराष्ट्रातील उद्योगक्रांतीच्या स्वागताकरिता सरकार सज्ज असल्याची ग्वाही दिली. मुख्यमंत्र्यांचे हे विधान केवळ निव्वळ राजकीय नाही. अलीकडच्या काही महिन्यांतील घडामोडी पाहता त्याला भक्कम आर्थिक आधार असल्याचे दिसते. एप्रिल २०२६ मध्ये राज्य सरकारने २.५६ लाख कोटी रुपयांच्या १८ महाप्रकल्पांना मंजुरी दिली असून त्यमधून सुमारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या सुमारे एक लाख नव्या संधी निर्माण व्हाव्यात असे उद्दिष्ट सरकारने निश्चित केले आहे. राज्यात उद्योगक्षेत्राचा व्यापक विकास पाहता, या क्रांतीच्या स्वागतासाठी महाराष्ट्र पूर्णपणे सज्ज आहे, हे स्पष्ट झाले आहे. काही वर्षांपूर्वी औद्योगिक गुंतवणूकदारांनी पसंती केवळ मुंबई-पुणे पट्ट्यापुरती मर्यादित असायची, आता हे चित्र बदलले आहे. नक्षली कारवायांमुळे त्रस्त असलेल्या गडचिरोली जिल्ह्याने गुतंवणुकीत पहिल्या क्रमांकाचा जिल्हा ठरण्यापर्यंत झेप घेतली असून देशाचे स्टील हब ठरण्यासाठी सिद्ध झालेल्या या जिल्ह्यात हरिओम पाईप इंडस्ट्रीच्या तीन हजार २३५ कोटींच्या नव्या गुंतवणूक प्रस्तावाने गडचिरोलीचा कायापालट होणार आहे. भंडारा आणि छत्रपती संभाजीनगर अशा भागात येऊ घातलेल्या महागुंतवणुकीतून राज्याच्या उद्योग व रोजगार क्षेत्रातील प्रादेशिक अनुशेषाचे ओझे आता हलके होऊ लागले असून प्रादेशिक समतोल राखला जात आहे. केवळ पारंपरिक कारखानेच नव्हे, तर सेमीकंडक्टर, ईव्ही बॅटरी, ग्रीन हायड्रोजन आणि स्पेस-डिफेन्स यांसारख्या हाय-टेक क्षेत्रांत महाराष्ट्र आघाडी घेत आहे. अर्थात, क्रांतीचा जयजयकार करताना, या क्रांतीकरिता पायघड्यादेखील घालणे हेच आव्हान असते. कारण क्रांतीचे बोट धरून येणारा विकास हा शाश्वत ठरावा याकरिता पायाभूत सुविधांचा पायादेखील भक्कम असावयास हवा. जागतिक दर्जाच्या इमारती आणि ग्रामीण दर्जाचे रस्ते, वीजपाणी अशा असमान सुविधांमुळे उद्योगांसमोर अडचणी निर्माण होऊ शकतात. महाराष्ट्रातील समृद्धी महामार्ग किंवा कोस्टल रोडसारखे प्रकल्प मोठे आहेतच, पण अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा आणि अखंड वीजपुरवठ्याचा उद्योगांना हमी हवी आहे. हाय-टेक कंपन्यांना लागणारे कुशल तांत्रिक मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध असणे गरजेचे आहे. आता केवळ आयटीआय मधील शिक्षण त्यासाठी पुरेसे नाही. जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे बोट धरून चालत असल्याने या शिक्षणावर आणि रोबोटिक्सच्या प्रशिक्षणावर भर देणे ही औद्योगिक क्रांतीची पुढची गरज ठरणार आहे. उद्योगांचे परवाने व सुविधांविषयक मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी 'सिंगल विंडो क्लिअरन्स' आणि 'ईझ ऑफ डुईंग'सारख्या योजनांद्वारे सकारात्मकता दर्शविणारी सरकारची मानसिकता नव्या क्रांतिपर्वास बळ देणारी ठरणार आहे यात शंका नाही. विशेषतः नागपूर विभागातील तीन महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गाचे प्रकल्प पूर्ण करण्यावर सरकारने दिलेला भर म्हणजे क्रांतीच्या सर्वव्यापी संचारासाठी खुली केलेली महाद्वारे ठरणार आहेत. केवळ गुंतवणुकीच्या आकड्यांवर लक्ष न देता, कौशल्य विकास आणि स्थानिक पायाभूत सुविधांवर अधिक भर दिला, तर खऱ्या अर्थाने सामान्यांच्या आयुष्यात बदल घडेल, असे संकेत देणाऱ्या या क्रांतीचा जयजयकार करावयास हवा.**

# आज जागतिक जलसंपत्ती दिन



पाणी तिथे वस्ती असा आजपर्यंतचा मानवी इतिहास सांगतो. आतापर्यंत पाण्याचा स्रोत पाहूनच माणसाने वस्ती केली, शहरे वसविली. आधुनिक जगात हे चित्र बदलले. माणसाकडे तंत्रज्ञान आले आणि नदीचे पाणी अडवून मोठा जलसाठा करण्याचे, ते दूरपर्यंत पोहचविण्याचे किंवा भूजलाचा उपसा करण्याचे तंत्र आपल्याला अवगत झाले. आज जेथे मोठमोठे उद्योग व रोजगाराची व्यवस्था असेल तेथे शहरे वसतात व पाण्याची व्यवस्था केली जाते. त्यामुळे नदी-नाल्यांची व पावसाच्या थेंबाची किंमत लोकांना कळत नाही. स्रोताची पर्वा न करता पाण्याचा वारेमाप वापर करणे सुरू आहे. यामुळे येणाऱ्या काळात परिस्थिती बिकट होण्याचे चिन्ह दिसून येत आहे. आज जागतिक जलसंपत्ती दिनाच्या निमित्ताने....

पृथ्वीच्या भूपृष्ठाच्या ७०.८० टक्के भूभाग पाण्याने आणि २९.२० टक्के भाग जमिनीने व्यापलेला आहे. जमीन आणि पाणी यांच्या प्रमाणात पाण्याचे प्रमाण अधिक असले तरी मानवाला वापरण्यायोग्य पाण्याचे प्रमाण कमी आहे. पृथ्वीवरील एकूण पाण्याच्या ९७ टक्के पाणी सागरात आहे. सागरीसंपत्ती सोडता समुद्राचे पाणी क्षारयुक्त असल्याने उपयोगशून्य आहे. शुद्ध पाण्याचे प्रमाण केवळ तीन टक्के एवढेच आहे. या तीन टक्केपैकी ६९ टक्के हे हिमनगात व्यापले आहे. त्यातील ३० टक्के हे भूजल, तर ०.३ टक्के नद्या, तलाव, विहिरीमध्ये साचले आहे. यावरून मानवी उपयोगायोग्य पाणी केवळ ०.०३ टक्के एवढेच आहे.

पाण्याचे संकट कमतरता आणि अशुद्धता अशा दुहेरी बाजूने भेडसावत आहे. औद्योगिक प्रदूषण व शहरात घराघरातून निघणारे सांडपाणी ही जलप्रदूषणाची दोन मुख्य कारणे आहेत. देशातील बहुतेक उद्योगधंदे हे नद्यांच्या किनारी प्रदेशात आहेत व त्यामुळे कारखान्यातील दूषित पाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीतील शुध्द पाणी प्रदूषित होते. रासायनिक खतांचा अमर्याद वापर, कीटकनाशके, जंतुनाशके व तणनाशकांच्या वाढत्या वापरामुळे व त्यांच्या पाण्यातील प्रवेशामुळे पाणी प्रदूषित होत आहे. औद्योगिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी कायदे आहेत, मात्र सांडपाण्याबाबत अजूनही उदासिनता आहे.

आगामी दोन दशकात पाण्याची जी टंचाई जाणवणार आहे, ते चित्र अत्यंत भीषण असणार आहे, कारण पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढते आहे आणि पाण्याची उपलब्धता मात्र कमी कमी होत आहे. २०३०पर्यंत पाण्याच्या मागणीत दुपटीने वाढ होईल, असा अंदाज आहे. पाण्याची मागणी वाढेल असा आंतरराष्ट्रीय जल संधारन समुहाने जो अभ्यास केला आहे, त्याचा तो निष्कर्ष आहे. २०३०पर्यंत पाण्याची मागणी ७०० शतकोटी घनमीटरपासून वाढून १४९८ शतकोटी इतकी होणार आहे. विशेषतः हिमालयाच्या परिसरात असलेल्या नेपाळ, चीन, बांगलादेश या देशांसह भारतात पाण्याची उपलब्धता अधिक बिकट व भयानक होण्याची शक्यता आहे. दरवर्षी २७५ शतकोटी पाण्याची होणारी टंचाई हे आपल्यासाठी मोठे आव्हान आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा यासारख्या पवित्र समजल्या जाणाऱ्या नद्यांतील पाण्याची पातळी किती प्रमाणात कमी होईल हा चिंतेचा विषय असणार आहे. एक बॅरल पाण्याची किंमत एक बॅरल खनिज तेलापेक्षा अधिक असेल, तो दिवस फार दूर नाही.

या संभाव्य धोक्याचा अंदाज घेऊन आपण धोक्याचा सामना करण्यासाठी आतापासून सिद्ध होण्याची गरज आहे. जलसंरक्षणाच्या कार्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देण्याची आश्यकता आहे. पाण्याचा प्रश्न आपण सरकारकडे सोपवून आपण मोकळे होत असतो, पण प्रत्येक नागरिकाने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करायला हवा, कारण काळ जितक्या वेगाने पुढे सरकत आहे, तितक्याच वेगाने प्रश्नांचे गांभिर्यही वाढते आहे. पाण्यामुळे होणाऱ्या रोगराईचे संकट सामान्य माणसांना सतत भेडसावत असते. आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून जलवायु परिवर्तन आणि जलसंकट यांची युती भारतात झाली आहे. तिला तोंड देण्यासाठी प्रभावी उपायांची आवश्यकता आहे. (साभार : इंटरनेट)

# महिला सक्षमीकरणाचा दीपस्तंभ 'माविम'च्या झळाळत्या वाटचालीचा वेध

महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वपूर्ण अंगीकृत उपक्रम असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) गेल्या पाच दशकांपासून राज्यातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक सक्षमीकरणाचा पाया भक्कम केला आहे. २४ फेब्रुवारी १९७५ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेच्या कार्याची व्याप्ती आणि महत्त्व लक्षात घेऊन २० जानेवारी २००३ रोजी राज्य सरकारने माविमला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखर संस्था' म्हणून घोषित केले. आज 'माविम' केवळ एक संस्था नसून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध महिला सक्षमीकरण योजनांची अंमलबजावणी करणारी एक प्रभावी नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे.

'माविम'च्या कार्याचा विस्तार आज महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये पोहोचला असून, त्यात मुंबई उपनगरासह २५९ नागरी स्थानिक संस्था आणि १० हजार ४९५ गावांचा समावेश आहे. या महामंडळाने तब्बल २०.७४ लक्ष महिलांना १ लाख ६८ हजार ३६१ स्वयंसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून संघटित केले आहे. विशेष म्हणजे, या बचत गटांनी बँकांकडून ६ अजार ५३९ कोटी रुपयांचे कर्ज मिळवले असून, त्याचा परतफेडीचा दर ९९.५ टक्के इतका कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना रोजगाराच्या संधींशी जोडून देणे ही महामंडळाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. केवळ आर्थिक मदत न करता, महिलांच्या क्षमता विकसित करणे आणि त्यांना शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभागी करून घेणे यावर माविमचा विशेष भर आहे.

संस्था बांधणी आणि बळकटीकरण हे माविमच्या कार्यप्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. बचत गट (SELF HELP GROUP), ग्राम संस्था (VILAGE ORGANISATION) आणि ३६१ समुदाय व्यवस्थापित संसाधन केंद्रांच्या (COMMUNITY MANAGE RESOURCE CENTRE) माध्यमातून तळागाळातील महिलांना सक्षम केले जात आहे. यापैकी ७९ टक्के लोकसंस्था (CMRC) आज स्वबळावर कार्यरत आहेत, हे या मोहिमेचे मोठे यश मानले जाते. आर्थिक सक्षमीकरणासोबतच सामाजिक समतेसाठी लिंग समानता, कायदेशीर जागरूकता, आरोग्य आणि राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग अशा विविध विषयांवरही काम केले जाते. महिलांच्या उपजीविकेसाठी प्रगत तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे यामुळे आज ८.७० लक्ष महिला यशस्वीपणे उद्योग व व्यवसायात गुंतल्या आहेत.

माविमच्या छत्राखाली अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवले जात आहेत त्यात नवतेजस्विनीः महाराष्ट्र ग्रामीण महिला उपक्रम विकास प्रकल्प., NULM आणि MSRLM: नागरी आणि ग्रामीण उपजीविका अभियानांची प्रभावी अंमलबजावणी., वॉश (WASH): पाणी, स्वच्छता आणि आरोग्याविषयीचे उपक्रम., स्पार्क (SPARK): अपंगत्व समावेशी ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आहेत.

'नवतेजस्विनी', 'अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम', 'राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान' आणि 'वॉश' (पाणी व स्वच्छता) यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे महिलांच्या उत्पन्नात ५,००० ते २०,००० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. माविमच्या या गौरवशाली प्रवासाची दखल राष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली असून, संस्थेला 'स्कोच गोल्ड अवॉर्ड', 'फिक्की स्वच्छता पुरस्कार' आणि नाबार्डतर्फे 'सर्वोत्तम फेडरेशन' असे अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. महिलांना केवळ कर्जदार न ठेवता त्यांना मालमत्तेचे मालक बनवणे आणि पंचायत राज संस्थांमध्ये त्यांचे स्थान निर्माण करून देणे, यातून 'माविम' खऱ्या अर्थाने महिलांच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार करत आहे. 'माविम' हे केवळ एक महामंडळ नसून ते महाराष्ट्रातील महिलांच्या सन्मानाचे, स्वावलंबनाचे आणि प्रगतीचे एक सशक्त प्रतीक बनले आहे.

-विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई.

## बदलते तंत्रज्ञान

### सॅटेलाइट फोन म्हणजे नक्की काय? जाणून घ्या..

आजच्या युगात स्मार्टफोन ही गरज बनली असली, तरी दुर्गम भागात जिथे नेटवर्क नसते, तिथे 'सॅटेलाइट फोन' हे एक अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. मात्र, हे उपकरण वापरण्याबाबत भारतात अत्यंत कडक नियम आहेत. अनेकदा माहितीअभावी लोक हे तंत्रज्ञान वापरण्याची चूक करतात, ज्यामुळे त्यांना कायदेशीर संकटाचा सामना करावा लागू शकतो. भारतात सॅटेलाइट फोन बाळगणे किंवा वापरणे कायद्याने गुन्हा ठरू शकतो, हे तुम्हाला माहित आहे का?



सॅटेलाइट फोन हे सामान्य मोबाइलपेक्षा पूर्णपणे वेगळे असतात. सामान्य फोन जमिनीवरील मोबाइल टॉवर्सच्या नेटवर्कवर अवलंबून असतात, तर सॅटेलाइट फोन थेट अवकाशात पृथ्वीभोवती फिरणाऱ्या कम्युनिकेशन सॅटेलाइटशी जोडलेले असतात. त्यामुळे डोंगरदऱ्या, घनदाट जंगले, समुद्र किंवा जिथे नेटवर्क पोहोचत नाही अशा ठिकाणीही हे फोन सहज चालतात. म्हणूनच, याचा वापर प्रामुख्याने लष्करी दले, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि समुद्री मोहिमांमध्ये केला जातो.

भारतात सॅटेलाइट फोन पूर्णपणे बॅन नसले, तरी ते वापरण्यावर कडक सरकारी निर्बंध आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सरकार यावर कडक नियंत्रण ठेवते. याचे मुख्य कारण म्हणजे, सॅटेलाइट फोनचे सिग्नल ट्रॅक करणे सामान्य मोबाइलपेक्षा अधिक कठीण असते. दहशतवादी किंवा देशविरोधी शक्तींकडून याचा गैरवापर होऊ नये, यासाठी सरकार सतर्क असते. भारतात केवळ सरकारची अधिकृत परवानगी असलेल्या सेवांनाच मान्यता देण्यात आली आहे.

जर तुम्ही सरकारी परवानगीशिवाय सॅटेलाइट फोन बाळगला किंवा वापरला, तर तुमच्यावर 'इंडियन टेलिग्राफ अॅक्ट १८८५' आणि 'इंडियन वायरलेस टेलिग्राफ अॅक्ट १९३३' अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते. अशा स्थितीत केवळ दंडच नाही, तर कारावासाची शिक्षाही होऊ शकते. परदेशातून भारतात परतताना अनेकांना सॅटेलाइट फोन सोबत आणण्याची सवय असते, पण अशा वेळी विमानतळावर तुमचे उपकरण जप्त केले जाऊ शकते आणि तुमच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

सॅटेलाइट फोन वापरण्याचा अधिकार सामान्यतः सरकारी संस्था, संरक्षण दल आणि आपत्ती निवारण यंत्रणांना असतो. काही विशिष्ट परिस्थितीत कंपन्या किंवा व्यक्तींनाही यासाठी परवानगी मिळू शकते, परंतु त्यासाठी कायदेशीर परवाना घेणे अनिवार्य आहे.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते राजा परांजपे



## निमित्त

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी चित्रसृष्टीचे शिल्पकार म्हणून विख्यात चित्रकर्ते राजाराम दत्तात्रेय परांजपे यांचा नेहमीच उल्लेख करण्यात आला आहे. जवळपास चाळीस वर्षांची चित्रसंपदा, अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, लेखक तसेच क्वचित प्रसंगी गायक अशा विविध क्षेत्रात ८० मराठी आणि हिंदी चित्रपटांशी आलेला संबंध अशी त्यामागची परंपरा होती. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात लहानसहान भूमिका करीत राजाभाऊंनी स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये एक महत्त्वाचा चित्रकर्ता म्हणून मान्यता मिळवली. या काळामध्ये राजा परांजपे यांनी मराठी चित्रपटांना आवश्यक असलेले नावीन्य तर दिलेच, त्याचबरोबर विषय आणि सादरीकरण यातही ताजेपणा आणला. रेखीव पात्ररचना आणि कल्पनापूर्ण दिग्दर्शन यांनी त्यांचे चित्रपट समृद्ध असत.

मिरज येथे २४ एप्रिल १९१० रोजी जन्मलेल्या राजा परांजपे यांचे बालपण पुण्यात गेले. शालेय शिक्षणात रस नसलेले राजाभाऊ त्याच वयात रंगभूमीकडे आकर्षित झाले होते. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बसवलेल्या माधवराव जोशी यांच्या 'विश्ववैचित्र्य' नाटकात त्यांनी एक विनोदी भूमिका केली आणि प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

राजाभाऊ तारुण्यात आले, तो मूकपटांचा काळ होता. अशा मूकपटांना पार्श्वसंगीत देण्याच्या इराद्याने त्यांनी चित्रपटगृहामध्ये प्रवेश मिळवला आणि तेथून या माध्यमाशी त्यांचा संबंध जुळून आला. पडद्यावर पाहिलेली उत्तमोत्तम चित्रपटांतील पात्रे पाहून ते भारावून जात आणि त्यातून त्यांची अभिनयाची आवड अधिकच वाढत गेली. या काळात त्यांनी एस.व्ही. वर्तक यांच्या 'लपंडाव' नाटकात 'वाटाणे' नावाचे विनोदी पात्र रंगवले. यानंतर जोमाने पुढे येणाऱ्या मराठी चित्रपटसृष्टीकडे ते आकर्षित झाले आणि त्यांनी बाबूराव पेंटर यांच्या 'सावकारी पाश'मध्ये पहिली भूमिका केली. या यशस्वी पदार्पणानंतर राजाभाऊंनी पेंटर यांच्याच 'प्रतिभा'मध्ये चकण्या मंडूकचे काम केले. यामध्ये केशवराव दाते आणि दुर्गा खोटे यांच्याही भूमिका होत्या. भालजी पेंढारकरांच्या 'गोरखनाथ'मधील परांजपे यांचा विनोदी भोलेनाथ चांगलाच गाजला. यामध्ये त्यांनी दोन गाणीही गायली.

अशा प्रकारे चित्रपटसृष्टीशी जवळीक साधलेली असताना त्यांना चित्रनिर्मितीच्या विविध बाबी समजून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली नसती तरच नवल होते. म्हणून त्यांनी भालजी पेंढारकर आणि मास्टर विनायक, तसेच 'नजम नक्वी', 'शोरी', 'वेदी' या हिंदी चित्रपट दिग्दर्शकांना साहाय्य केले. याचीच परिणती म्हणून राजा परांजपे यांना 'बलिदान' या पहिल्यावहिल्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची संधी मिळाली. यानंतर पुढच्याच वर्षी आलेल्या 'जिवाचा सखा'ने एका बाजूला रौप्यमहोत्सव साजरा केला, तर दुसऱ्या बाजूला राजा परांजपे, ग.दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांना एकत्र आणले.

एक यशस्वी चित्रकर्ता म्हणून कारकिर्द असलेल्या राजा परांजपे यांना प्रेक्षक आणि समीक्षक यांनी भरभरून दाद दिली. आपल्या चित्रपट कारकिर्दीमध्ये राजा परांजपे यांनी दोन राष्ट्रीय आणि चार राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त केले. ९ फेब्रुवारी १९७९ रोजी त्यांचे निधन झाले.

**-चंद्रशेखर जोशी**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### चांगल्या झोपेसाठी रात्री दुधात 'हे' घ्या

हेल्दी राहण्यासाठी रात्री चांगली झोप घेणं फार महत्त्वाचे असते. आजकालच्या ताण-तणावपूर्ण जीवनशैलीमुळे लोकांना झोप न येण्याची समस्या उद्भवते. रात्रीच्या वेळी व्यवस्थित झोप न झाल्याने शारिरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. याशिवाय मेंटल हेल्थवरही परिणाम होतो. झोपण्याआधी दूधाचे सेवन तब्येतीसाठी बरेच फायदेशीर ठरते.



दूधात ट्राइप्टोफॅन नावाचे अमिनो एसिड असते, ज्यामुळे झोप चांगली लागण्यास मदत होते. रात्री झोपण्याआधी दूधात काही पदार्थ मिसळून प्यायल्याने झोप चांगली येते. रात्री झोपण्याआधी दूधात दालचिनी मिसळून प्यायल्याने चांगली झोप येण्यास मदत होईल. यासाठी एक ग्लास कोमट दूधात अर्धा चमचा दालचिनी पावडर मिसळून प्या.

जर तुम्हाला व्यवस्थित झोप येत नसेल तर दुधात अश्वगंधा पावडर मिसळून पिऊ शकता. यासाठी एक ग्लास दुधात कोमट दूधात एक चमचा अश्वगंधा पावडर मिसळून याचे सेवन करा. ज्यामुळे ताण-तणाव दूर होण्यास मदत होईल आणि चांगली झोप येण्यास मदत होईल. रात्री झोपण्याच्या आधी हळदीचे दूध पिणं फायदेशीर ठरतं. यामुळे शरीराचा थकवा, ताण-तणाव दूर होण्यास मदत होते, ज्यामुळे चांगली झोप येण्यास मदत होते. नियमित रूप सेवन केल्याने अनिद्रेचे समस्या दूर होण्यास मदत होते.

झोपण्याच्या आधी गरम दूधात जायफळ मिसळून प्यायल्याने ताण-तणाव कमी होण्यास मदत होते आणि चांगली झोप येते. यामुळे शरीराला थकवा जाणवत नाही. एक ग्लास कोमट दूधात चुटकीभर जायफळ पावडर मिसळून प्या. याच्या नियमित सेवनाने अनिद्रा आणि एंग्जायटीची समस्या दूर होण्यास मदत होते.

दूध शरीराच्या चांगल्या आरोग्यासाठी उत्तम ठरते. जास्तीत जास्त घरांमध्ये मुलांना रात्री दूध पिण्याचा सल्ला दिला जातो, कारण यामुळे चांगली झोप येते असा सर्वांचा समज असतो.

रिसर्चनुसार रात्री दूध प्यायल्याने माईंड आणि बॉडी रिलॅक्स राहण्यास मदत होते. चांगली, शांत झोप येते. दूध आणि डेअरी उत्पादनांमध्ये ट्रिप्टोफॅन असते, जे एक अमिनो ॲसिड आहे.

# रायगडात पशुसंवर्धन विभागाचा १३५ कोटींचा आराखडा तयार

**पेण : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांमुळे पशुसंवर्धन खात्याच्या निधीत मोठ्या प्रमाणात वाढला असून राज्याला सुमारे साडेचार हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. यामधून रायगड जिल्ह्याला अंदाजे दीडशे कोटी रुपयांचा निधी मिळू शकतो, त्या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषदेमध्ये नवनिर्वाचित कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक बुधवारी अलिबाग येथील प्रशासकीय कार्यालयात पार पडली.



या बैठकीला रायगड जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त डॉ. सचिन देशमुख, सहाय्यक आयुक्त डॉ. शामराव कदम, सहाय्यक आयुक्त डॉ. रत्नाकर काळे आदींसह जिल्ह्यातील सर्व तालुका पशुसंवर्धन अधिकारी उपस्थित होते. बैठकीत रायगड जिल्ह्यासाठी तब्बल १३५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या निधीचा जास्तीत जास्त लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर विशेष भर देण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र ग्रामीण पशुधन उद्योगता योजना' अंतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लाभार्थी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यावेळी बोलताना वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात किमान १००० ते १५०० लाभार्थी तयार करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, पुढील १५ दिवसांत लाभार्थ्यांची यादी, कागदपत्रे व ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अर्जातील त्रुटी तत्काळ दूर करून निधी मिळवण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष योजना राबवण्यात येणार असून, कष्टकरी महिलांना सुधारित देशी कोंबड्यांची १०० पिल्ले देण्याची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेलाही लवकरच समितीची मान्यता मिळणार असून, मोठ्या संख्येने ऑफलाईन लाभार्थी मंजूर केले जाणार आहेत. एकूणच, पशुसंवर्धन योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हेच प्रशासनाचे प्रमुख ध्येय असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

# पोलादपूरमधील विनापरवाना बांधकामाविरोधात गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीने शहरातील आनंदनगरमधील एका विनापरवाना बांधकामाविरूध्द केलेल्या तक्रारीची दखल घेत पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांना यापुढे महाराष्ट्र नियोजन व नगररचना अधिनियमाचा चाप बसणार असून लवकरात लवकर अशा बांधकामांवर निष्कासित करण्यासाठी अतिक्रमणविरोधी हातोडा पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सातबारा उतारा ज्यांच्या नांवे त्यांच्याच नावाने मिळकतपत्रिका तयार न करता बेकायदेशीररित्या मालकीहस्तांतरण करण्यात आलेल्या प्रकरणात भूमी अभिलेख विभागात गेल्या 12 वर्षांपासून न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणामध्ये मयत व्यक्तीच्या वालीवारसांनी आधीचे विनापरवाना बांधकाम तोडून पुन्हा नव्याने विनापरवाना बांधकाम केल्याप्रकरणी पोलादपूर नगरपंचायतीकडे संबंधित सातबारा उतारा नांवे असलेल्यांच्या अखत्यारींनी 13 जानेवारी 2026 रोजी तक्रार अर्ज केला होता. यानंतर नगरपंचायतीने मयत व्यक्तीच्या नावाने दि.19 जानेवारी 2026 रोजी अनधिकृत बांधकाम केल्याची नोटीस काढून जमिनीची मालकी, आधीच्या बांधकामाचा परवाना व संबंधित कागदपत्रे सादर करण्याची मागणी करून सदरचे बांधकाम तोडण्याचा आदेश दिला.

यानंतरही या पत्राला प्रतिसाद न देता संबंधितांनी घराचे विनापरवाना बांधकाम सुरूच ठेऊन विनापरवाना बांधकाम करणाऱ्यांनी घरदुरूस्ती परवान्यासाठी अर्ज शेखर पालकर यांच्या नांवे नगरपंचायतीकडे दिला. मात्र, परवाना मिळण्याआधीपासून सुरू असलेले बेकायदेशीर विनापरवाना बांधकाम थांबविले नाही.

यानंतर मा.मुख्याधिकारी नगरपंचायत पोलादपूर यांनी मयत रमेश पालकर यांना अनधिकृत बांधकाम नोटीस मिळाल्यापासून 30 दिवसांच्या आत काढून टाकावे व उक्त जागेचा उपरनिर्दिष्ट वापर बंद करावा, अन्यथा नगरपंचायतमार्फत निष्कासनाची कारवाई केली जाईल. या सूचनांचे अनुपालन करण्यास तुम्ही उक्त अधिनियमातील कलम क्र. 52 व 53 अन्वये फौजदारी कारवाईस पात्र व्हाल आणि वरील सूचनांची अंमलबजावणी तुमचे जबाबदारीवर व तुमच्या खर्चाने केली जाईल, याची नोंद घ्यावी. अशी नोटीस दि. 11 फेब्रुवारी 2026 रोजी बजावली.

यानंतर संबंधित सातबारा उतारा नांवे असलेल्यांच्या अखत्यारींना अन्याय होण्याची खात्री पटली असताना पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी नगरपंचायतीचे रचना सहायक निखिल कांबळे यांना प्राधिकृत करून रितसर तक्रार दिल्यानुसार पोलीस हवालदार कोंडाळकर यांनी दि. 19 एप्रिल 2026 रोजी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. 28-2026 नुसार शेखर रमेश पालकर याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरिक्षक सरोदे हे तपास करीत आहेत.

# कर्जत तालुक्यातील चार जागा बिनविरोध; दोन जागांसाठी होणार पोटनिवडणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात चार ग्रामपंचायतीमध्ये रिक्त असलेल्या सहा जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या पोटनिवडणुकीसाठी २८ एप्रिल रोजी मतदान होणार असून चार जागा बिनविरोध झाल्याने अवघ्या दोन जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खल्लाटी, दहिवली तर्फे वरेडी, गौरकामत आंभेरपाडा, या चार ग्रामपंचायत मधील सहा जागा रिक्त झाल्या होत्या. त्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या पोट निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्याचे मुदतीत चार जागांवर केवळ एक नामांकन अर्ज दाखल झाल्याने अर्ज माघार घेण्याच्या मुदतीनंतर एकमेव अर्ज कायम राहिले. त्यामुळे दहिवली तर्फे वरेडी, अंभेरपाडा, गौरकमत आणि पाली तर्फे कोतवाल खल्लाटी या चार ग्रामपंचायत मधील प्रत्येकी एक जागा बिनविरोध झाली. आंभेरपाडा मध्ये गोराबाई सुनील काठे या अनुसूचित जमाती महिला राखीव जागेवर तर शिवाजी मालू मिसाळ हे दहिवली तर्फे वरेडी मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव जागेवर बिनविरोध निवडून आले. तर गौरकामत मध्ये सुमन बंडू वाघमारे या अनुसूचित जमाती महिला राखीव जागेवर आणि दीक्षा देविदास देशमुख या पाली तर्फे कोतवाल खल्लाटी या ग्रामपंचायत मध्ये सर्वसाधारण महिला जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून आले.

पाली तर्फे कोतवाल खल्लाटी आणि गौरकामत येथील एका जागेसाठी एकाहून अधिक उमेदवार रिंगणात असल्याने निवडणूक होत आहे. पाली तर्फे कोतवाल खल्लाटी मधील एका सर्वसाधारण जागेसाठी आशिष सुरेश देशमुख आणि मयूर समीर देशमुख यांच्यात सरळ लढत होणार आहे. तर गौरकामत ग्रामपंचायत मधील एका जागेसाठी होत असलेल्या पोट निवडणुकीत सर्वसाधारण महिला जागेसाठी स्नेहा स्वप्नील देशमुख आणि श्रुती समीर दळवी यांच्यात सरळ लढत होत आहे. २८ एप्रिल रोजी या दोन्ही जागांसाठी पोट निवडणुक होणार असून २९ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार अंतर्गत त्रुटी दूर करून अर्ज फेरसादर करण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सन २०२४-२५ या वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आली आहे.त्यानुसार सन २०२५-२६ या वर्षात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत ऑनलाईन सादर केलेल्या अर्जामधील काही अर्ज त्रुटी पुर्ततेकरीता परत पाठविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी अर्ज आपले लॉगिन आयडी तपासून त्यामध्ये दर्शविण्यांत आलेल्या त्रुटींची पूर्तता करुन येत्या ०७ दिवसांत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन फेर सादर करावेत, असे आवाहन आहे.


**अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात**

पत्ता : नवीन प्रशासकिय भवन इमारत, पनवेल, पहिला मजला, दालन क्र. १०२, पनवेल - ४१०२०६

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

६८ क दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/०५/२०२६

१. श्रीम. फशीबाई गणपत मते, रा. कसळखंड, ता. पनवेल, जि.रायगड } **अर्जदार**

**विरुध्द**

१. श्री. महादू पदू घरत रा. कसळखंड ता.पनवेल, जि. रायगड } **सामनेवाला**

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | कसळखंड | १३१ | २ ब | ०-३५-४० पो.ख. ०-०७-३० **एकूण क्षेत्र ०-४२- ७०** | ६.३७ |

अर्जदार यांनी वरील जमिनीच्या इतर हक्कातील सामनेवाला यांची नांवे कमी करणेकामी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ६८क, प्रमाणे अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल याच्या न्यायालयात, दिनांक २०/०३/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत दयावयाची असल्यास दिनांक **२८/०४/२०२६** रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण **पनवेल** येथे **शेतजमिन न्यायाधिकरणापुढे** हजर होण्याविषयी आपणास (आपल्या विधिज्ञामार्फत) यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी ( विधिज्ञामार्फत ) कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामा गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येईल व प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी. तसेच सुनावणीच्या तारखेनंतर ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी. या अनुषंगाने फेर नोटीस काढली जाणार नाही याची नोंद घेणेत यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २१/०४/२०२६

Digitally signed by Archana Ashok Pradhan Date: 22.04.2026 14:48:30

कोर्टाचा शिक्का

अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पनवेल, रायगड

२/- आपल्या कार्यक्षेत्रातील दावा मिळकतीचे हद्दीतील सामनेवाले यांचेकरीता वरील नोटीस बजावून अहवाल पुढील सुनावणी दिनांक **२८/०४/२०२६** पुर्वी या कार्यालयास सादर करावा. सामनेवाले आपले कार्यक्षेत्रात आढळून न आल्यास याबाबत गाव चावडीवर, दावा मिळकतीवर नोटीस प्रसिध्द करणेत येऊन पंचनाम्यासह अहवाल सुनावणी दिनांकापुर्वी सादर करावा. तसेच सामनेवाला मयत असल्याचे आढळून आल्यास त्यांचे वारसांना सदर नोटीसची बजावणी करुन पंचनाम्यासह अहवाल दिनांक **२८/०४/२०२६** सादर करावा.


# नादब्रह्म संगीत वर्गाच्या वर्धापन दिनात गुणगौरव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील नादब्रह्म संगीत वर्गाच्या पंधराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शिष्यांचा गुणगौरव सोहळा व सादरीकरण संपन्न झाले. शिष्यांनी गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.



कर्जत महिला मंडळाच्या सभागृहात नादब्रह्म संगीत वर्गाच्या पंधराव्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ह. भ. प. गुरुवर्य भगवानबुवा आपटेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी संगीत अलंकार मजहर शेख, अखिल भारतीय वारकरी कोकण प्रांत अध्यक्ष ह. भ. प. धनाजी गायकर, विजय सावंत, मधुकर ठोंबरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

संचालक अमर सावंत यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात नांदब्रह्मच्या सोळा वर्षाच्या वाटचालीची माहिती सांगताना, ' माझे गुरु मझहर खान अंध असूनही त्यांनी संगीत क्षेत्रातील अनेक विषयांवर विशारद केले असून ते संगीत अलंकार आहेत. त्यांच्या कडे कोणत्याही प्रकारच्या नोट्स नाहीत मात्र ते म्हणजे एक संगणकच आहेत. याचा अनुभव मला आहे. असे गुरु मिळण्यासाठी भाग्य लागते. विद्यार्थ्यांना संगीत विषयामुळे दहावी परीक्षेत अधिक गुण मिळतात.' असे सांगितले.

ह. भ. प. धनाजी गायकर यांनी, 'संगीत मृत्यूला सुद्धा थांबवू शकते. इतकी त्याची ताकद आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासा व्यतिरिक्त एखादी कला आली पाहिजे.' अशी अपेक्षा व्यक्त केली. मझहर शेख यांनी, ' शिष्याने गुरूला कधी विसरू नये. शिष्य जेंव्हा नावारूपास येतो तेंव्हा गुरुला अतिशय आनंद होत असतो. गुरु कडून जितके ज्ञान घेता येईल. तितके घेण्याचा प्रयत्न शिष्याने केला पाहिजे.' असे स्पष्ट केले. ह. भ. प. आपटेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. सूत्रसंचालन सविता हाके आणि निमा अभंगे - कोशे यांनी केले.

याप्रसंगी अनिल पिंपरकर, मंगेश सावंत, रवींद्र थोरवे, दीपक कोरडे, उमेश चव्हाण, चंद्रकांत इंगोले, कल्पेश शहा, ज्ञानेश्वर वाडीले, संतोष सोनावणे, बळीराम डोंगरे, गणेश मेंगाळ, विशाल सुरावरकर, कृशाली कोरडे, रश्मी गुजराती आदी उपस्थित होते.

# अलिबागमध्ये राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा रंगणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

एकता इंटरप्रायजेस मुंबई यांच्या वर्धापन दिनानिमित्त आणि सौ. एकता निखिलेश म्हात्रे यांच्या सौजन्याने, कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, अलिबाग यांच्या वतीने 'राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा २ मे दुपारी २.०० वाजता भाग्यलक्ष्मी हॉल, चेंढरे, अलिबाग येथे होणार आहे.

ही स्पर्धा लहान वयो गट (५ ते १४ वर्षे) व मोठा वयो गट (१५ ते ५० वर्षे) अश्या दोन गटात होणार आहे. लहान प्रथम क्रमांक ३००१ रुपये रोख , स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र , द्वितीय २००१ रुपये रोख स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र , तृतीय १००१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. मोठ्या वयोगटात प्रथम क्रमांक ५००१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र , द्वितीय ३००१ रुपये रोख,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र , तृतीय २००१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. दोन्ही गटांत प्रत्येकी दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देखील दिली जाणार आहेत.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत https://forms.gle/jvjzGKvEiDPzMdSd९ या गुगल लिंकमध्ये नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. लहान गटासाठी १०० रुपये आणि मोठ्या गटासाठी १५० रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी आणि नाव नोंदणीसाठी इच्छुकांनी प्रतिम सुतार ९७६२९११९७१ , संदेश मयेकर ८६९८०००५१५ किंवा शेखर झावरे ८९८३०९८०५४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कलारंग संस्थेचे अध्यक्ष तथा स्पर्धा प्रमुख प्रकल्प बाबू वाणी यांनी केले आहे.

# नागाव येथे श्री साई नेत्रालयात मोफत नेत्र उपचार शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव येथील श्री साई आरोग्य सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संचालित श्री साई नेत्रालयामध्ये दर महिन्याच्या २३ तारखेला आयोजित करण्यात येणारे मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शबिरात सुमारे ६० रुग्णांची मोफत डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच ज्यांना गरज आहे अशा रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.या शिबिरात वैद्यकीय पथकाचे मार्गदर्शन डॉ. हेत किरण मार्माणिया यांनी केले. ऑप्टोमेट्रिस्ट म्हणून कन्से प्रातकी मगत यांनी सेवा बजावली,


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. २**

**ई निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई,दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या प्रश्नांची उत्तरे / महामंडळाचा खुलासा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्राच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल आणि दुरुस्ती..... शुद्ध पाण्याच्या व सांडपाणी निःसरण वाहिनीवर बसवलेल्या फुलबोर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटर्ससाठी दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीकरिता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १८,९४,०६८.०० |

उपरोक्त कामाबाबत कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २७/०४/२०२६ पासून शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**पनवेल महानगरपालिका**

तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड ४१०२०६

**ई-निविदा सूचना**

**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) ब-१ नमुन्यातील खालील नमुद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे.

जा.क्र.: पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.११५/१२६/२०२६ दिनांक : २३/०४/२०२६

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रू) | कोरी ई निविदा किंमत (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/विद्युत /०२/२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरामधील 'बल्लाळेश्वर' मंदिर व रामेश्वर मंदिर प्रवेशद्वार येथे विद्युत रोषणाई व विद्युत विषयक कामे करणे. | ३९,३२,७२१.०० | ३,९३,२७२.०० | ५९०.०० |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ http://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**सही /-**
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका

# डिजिटल नगरसेवक कार्यालय उपक्रमाचा आदर्श सर्वांनी घ्यावा -संजीव नाईक



**नवी मुंबई : बातमीदार**

वेदांत जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट व श्री सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने माजी खासदार डॉ. संजीव नाईक, नगरसेवक सुनील कुरकुटे आणि समाजसेवक जगदीश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने १९ एप्रिल २०२६ रोजी मिलेनियम टॉवर शॉपिंग कॉम्प्लेक्स हॉलमध्ये १९ प्रभाग मधील नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर, एसटी महामंडळ स्मार्ट कार्ड नाव नोंदणी आणि मोफत दाखले वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आमचे जुने सहकारी सुनिल कुरकुटे यांचा वाढदिवस सेवा सप्ताहने झाला, याचा मला आनंद आहे. हा चांगला पायंडा सर्व नगरसेवक मंडळींनी पाडला आहे. मोफत आरोग्य शिबिराबरोबरच क्यूआर कोडद्वारे डिजिटल तक्रार निवारण सादर केले आहे, याचा सर्व नगरसेवकांनी आदर्श घ्यावा असे ते म्हणाले. ते म्हणाले की, सानपाड्यातील रहिवाशांनी अनेक वर्षांनी आपल्या चारही नगरसेवकांना निवडून दिले आहे. त्यांनी आता मिळालेल्या संधीचे सोने केले पाहिजे. नगरसेवक सुनिल कुरकुटे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोणतेही पुष्पगुच्छ न स्वीकारता शिक्षणाला उपयुक्त असणाऱ्या फुलस्केप वह्या स्वीकारून आपला वाढदिवस साजरा करून समाजाला एक चांगला संदेश दिला आहे. मोफत आरोग्य शिबिरामध्ये नेरूळ येथील सुश्रुषा हॉस्पिटलने ५५ नागरिकांची हृदय तपासणी करून घेतली. सानपाडा सेक्टर ११ मधील भारत ई सेवा केंद्राच्या विजया विश्वासराव यांच्या सहकार्याने एसटी महामंडळ स्मार्ट कार्डसाठी सुमारे १०८ ज्येष्ठ नागरिकांच्या नावाची नोंदणी झाली.

तसेच महाईसेवा केंद्राचे गणेश महाले यांच्या सहकार्याने ८९ नागरिकांनी विविध शासकीय दाखल्यांसाठी नोंदणी केली. याप्रसंगी माजी खासदार संजीव नाईक व मान्यवरांच्या हस्ते डिजिटल नगरसेवक कार्यालय हेल्पलाइन नंबर फलक लॉन्च करण्यात आले.

## नवी मुंबईत आयकर अधिनियम विषयावर जनजागृती कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

१ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या प्राप्तिकर कायदा, २०२५ च्या प्रमुख वैशिष्ट्यांची माहिती करून देण्यासाठीा देशव्यापी उपक्रमाचा एक भाग म्हणून, प्राप्तिकर विभाग, मुंबईच्या वतीने २१ एप्रिल २०२६ रोजी नवी मुंबईत एका जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवी मुंबईतील करदाते, सनदी लेखापाल, व्यापारी संघटना आणि विविध व्यावसायिक अशा समाजाच्या विविध स्तरांतील २५० हून अधिक व्यक्तींचा या कार्यक्रमात सहभाग होता. याप्रसंगी,विभागाच्या मुंबई शाखेचे मुख्य प्राप्तिकर आयुक्त डॉ. विक्रम सहाय यांनी, नवीन कायदा करदात्यांसाठी अत्यंत फायद्याचा असून त्यामध्ये आणलेल्या सुलभता आणि सुसूत्रीकरणामुळे अनुपालनाचा खर्च कमी होणार असल्याचे सांगितले. हा कायदा आधुनिक काळाशी सुसंगत असण्यासोबतच त्याची सुव्यस्थित रचना करण्यात आली असल्याने तो करदात्यांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना उपयुक्त वाटेल आणि राष्ट्र उभारणीसाठी कर भरण्याचे त्यांचे कर्तव्य पूर्ण करण्यास त्याची मदत होईल.

प्रधान प्राप्तिकर आयुक्त डॉ. माया माहेश्वरी`.सहाय्यक प्राप्तिकर आयुक्त शिल्पा खणीकर आणि मानस साहू यांनी नवीन कायद्यासंबंधीचे सादरीकरण केले.




## लाल मैदानाची स्वच्छता मोहीम; 'सावरकर' नावाचा फलकही हवा!

**उरण : बातमीदार**



उरण नगरपरिषद हद्दीतील स्वातंत्र्यवीर सावरकर (लाल) मैदानावर गुरुवार, दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे, मात्र या स्वच्छता मोहिमेच्या पार्श्वभूमीवर एक गंभीर बाब समोर आली आहे. मैदानाला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव असले तरी प्रत्यक्षात नामफलकच नाही.

नगर परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत नियमित सफाई कामगारांसोबत अतिरिक्त मनुष्यबळही तैनात करण्यात येणार आहे. मैदानाची दयनीय अवस्था लक्षात घेता ही मोहीम व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

यावेळी नागरिकांना, समाजातील नेत्यांना, व्यापारी-व्यावसायिकांना तसेच विशेषतः खेळाडूंना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मैदान आपले आहे, त्याची स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असा संदेश प्रशासनाकडून देण्यात आलाय.

दरम्यान, या मैदानाला अधिकृतरित्या स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान असे नाव देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात येथे सावरकरांच्या नावाचा नामफलकच नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे हे मैदान आजही "लाल मैदान" या नावानेच ओळखले जात आहे.

यावर उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू यांनी नगरपालिकेकडे तातडीने नामफलक लावण्याची मागणी केली आहे. नागरिकांमधूनही याबाबत आग्रह व्यक्त होत आहे.

## श्री अमृतेश्वर मंदिराच्या सभामंडपासाठी ५० लाख रुपयांचा आमदार निधी मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**



आग्रोळी गावातील संकट मोचन हनुमान मंदिर सभा मंडपाच्या लोकार्पणाच्या वेळी आग्रोळी ग्रामस्थांनी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्याकडे मागणी केली होती की असाच सभा मंडप आग्रोळी गावातील श्री अमृतेश्वर मंदिर सभोवती झाला पाहिजे. त्या अनुषंगाने आग्रोळी गावातील श्री अमृतेश्वर मंदिराच्या सभा मंडपासाठी रु. ५० लाखांचा आमदार निधी त्वरित मंजूर करून दिल्याबद्दल गावातील नागरिकांनी आमदार मंदा म्हात्रे यांची भेट घेऊन मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

तसेच आग्रोळी गाव हे सांस्कृतिक व धार्मिक परंपरांनी समृद्ध असून, श्री अमृतेश्वर मंदिर हे ग्रामस्थांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान आहे. मंदिर परिसरात सभा मंडपाची आवश्यकता अनेक दिवसांपासून जाणवत होती. विविध धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम तसेच गावातील महत्त्वाच्या बैठका आयोजित करण्यासाठी सुसज्ज जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने आमदार मंदा म्हात्रे यांनी पुढाकार घेऊन स्थानिक आमदार विकास कार्यक्रम अंतर्गत रु. ५० लाखांचा निधी मंजूर करून दिला.

तसेच आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, या सभा मंडपामुळे आग्रोळी गावातील धार्मिक व सामाजिक कार्यक्रम अधिक सुव्यवस्थितपणे पार पडतील व शिव भक्तांचे उन्हाला, पावसाळयापासून सरंक्षण होणार आहे. त्याच बरोबर महाशिवरात्री निमित्त देखील शिव भक्तांना सभा मंडपाचा मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच गावाच्या विकासातही याचा मोठा हातभार लागणार आहे.

तसेच आग्रोळी गावातील समाज मंदिर शेजारील ब्रिजखाली सरंक्षण भिंत बांधणे व गेट बांधून प्रशस्त करणे, संगम अपार्टमेंटच्या बाजूला समाज मंदिर उभारणे तसेच अमृतेश्वर मंदिराच्या बाजूची विहिरीतील गाल काढून स्वच्छ करणे, समाज मंदिर येथे रात्रीची पोलीस गस्त वाढविणे अशा विविध कामे आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समोर ग्रामस्थांनी मांडल्या व उपस्थित अधिकाऱ्यांना त्वरित काम पूर्ण करण्याचे आदेश दिले व सीबीडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करून आग्रोळी येथे पोलीस गस्त वाढविण्यास सांगितले. त्यामुळे "स्थानिक नागरिकांच्या गरजा ओळखून त्यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणे हीच माझी भूमिका आहे असे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. आग्रोळी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबद्ध आहे असे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले.

## नवी मुंबईतील समस्यांबाबत आमदार मंदा म्हात्रे यांनी घेतली आयुक्तांची भेट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नवी मुंबईतील विविध नागरी समस्यांबाबत आमदार मंदा म्हात्रे यांनी बुधवारी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची भेट घेत चर्चा केली. या भेटीत बेलापूर येथील सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजला गती देणे, नवी मुंबई मनपा आस्थापनेवर असलेल्या स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांना सेवेत कायमस्वरूपी करणे, पामबीच सिग्नल मार्गावर अनधिकृत उभारण्यात आलेल्या लोखंडी कमान, तसेच महापालिकेमध्ये बेकायदेशीर शिक्षक पुरवणारी उत्कर्ष महिला संस्थेला रू. ३३ कोटीचे काम देणेबाबत ठेकेदाराची चौकशी करणे अशा महत्वपूर्ण विषयांवर महापालिका आयुक्तांचे लक्ष वेधले.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी चर्चेत नवी मुंबईतील खेळाडूंना आधुनिक क्रीडा व मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून अनेक वर्षापासून महापालिकेकडे पाठपुरावा आहे . त्यात बेलापूर गाव येथील कुस्तीच्या मैदानावर आधुनिक क्रीडा संकुल उभारणे, सीबीडी से-३ राजीव गांधी मैदानालगत सुविधायुक्त इनडोअर स्पोर्ट इमारत बांधणे, नेरूळ सेक्टर ९ येथील आचार्य तुळशी मैदानात आधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करणे, वाशी, सेक्टर १० इथ विविध खेळांचे आधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करणे आदी कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगितले .

राष्ट्रनिर्मिती करिता योगदान देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रमाता जिजाऊ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पूर्णाकृती पुतळे उभारणे यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी त्यांनी आयुक्त यांच्याकडे केली आहे.

याशिवाय पामबीच लगत असेलेल्या मोकळ्या भूखंडावर फुलपाखरू उद्यान उभारणे, उरण फाटा आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधणे, सीबीडी से-१ येथे वाचनालय बांधणे, शहाबाज गाव फणसपाडा गावातील नागरिकांना समाज मंदिर सभागृह बांधणे, सारसोळे गावातील से- ६ येथील लोकमान्य टिळक समाज मंदिर सभागृह पूर्ववत करणे, वाशी से-१० ए मिनीसिशोर व सागर विहार परिसर विकसित करणे आदी विकास कामे करणे बाबत महापालिका आयुक्त सकारात्मकता दर्शवली. तसेच भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पत्राद्वारे उपस्थित केलेल्या समस्यांवर आयुक्त शिंदे यांनी सकारात्मकता दाखवत तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करून सदरच्या समस्या सोडविण्याचे आदेश दिले.

यावेळी आयुक्त डॉ . कैलास शिंदे यांनी वरील विषयांची गांभीर्याने दखल घेत लवकरात लवकर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक राजू शिंदे, माजी नगरसेवक जनार्धन सुतार, माजी नगरसेवक दि ना पाटील, भाजपा वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, समाजसेवक संतोष कोळी, भूषण कोळी, सुधीर पाटील, राजेश पाटील, प्रकाश मुकादम, रुपेश मढवी, जयदेव ठाकूर, निलेश पाटील, कल्पेश कुंभार, वेताळेश्वर मंदिर ट्रस्ट अध्यक्ष सुरेश कोळी, दिवाळे विरंगुळा केंद्र अध्यक्ष चंद्रकांत कोळी, भाजपा आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## एपीएमसीत हापूस आंब्याचे दर आवाक्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

एप्रिल, मे महिना सुरु झाला की, सर्वांनाच वेध लागते आंब्याची चव कधी चाखायला मिळणार याचे.., १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयाच्या महूर्तानंतर एपीएमसीच्या फळ बाजारात फळांचा राजा म्हणून ओळखला जाणाऱ्या हापूस आंब्याचे आगमन झाले, तर बाजारात कर्नाटकी आंबा देखील दाखल झाला असून त्याला देखील मागणी आहे. आंब्याची आवक वाढल्याने बाजारात हापूससह इतर आंब्यांचे दर घटल्याने नागरिकांना आता आंब्याची मनसोक्त चव चाखता येता आहे.

राज्यात यंदा बदलत्या हवामानाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. आंब्यासह इतर उत्पादनांवर हवामानाचा परिणाम झाला आहे. अवकाळी पाऊस आणि कोकणातील वादळामुळे यंदा आंबा उत्पादन घटण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर आंब्याचे दर गगनाला भिडतील, अशी भीती होती, मात्र सर्व अंदाज फोल ठरवत एपीएमसीत आंब्याची विक्रमी आवक झाल्याने दर सामान्यांच्या आवाक्यात आले आहेत. वाशी एपीएमसी फळ मार्केटमध्ये एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून दररोज सरासरी ५० हजार हापूस आंब्याच्या पेट्या येत आहेत. ४ ते ९ हजार रुपयांपर्यंत पेटींचे पोहचलेले दर आवक वाढल्याने कमी होऊन १५०० ते ५ हजारांच्या दरम्यान आले आहेत.

अक्षय्य तृतीयानंतर हजारो पेट्या दाखल, हापूस आंब्याचे दर काही प्रमाणात घसरल्याचे दिसत आहे. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या पुरवठ्याचा थेट परिणाम दरांवर झाला असून, घाऊक बाजारात हापूस आंब्याचे दर काही प्रमाणात घसरले आहेत.बाजारात कोकणातील रत्नागिरी पायरी आंबा आणि केशर आंबा देखील झाला असून त्याचे १७०० रुपये डझनपासून पुढे दर असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी आवक कमी असली तरी या हंगामातील आंब्याची सर्वाधिक आवक अक्षय तृतीयेच्या पूर्वसंध्येला झाली. दीड हजारापासून आंब्याच्या पेटीची सुरुवात आहे, अशी माहिती फळ बाजार संचालक संजय पानसरे यांनी दिली आहे.

### बनावट फळावर लक्ष

**कोकणातून हापूस आंब्याच्या सरासरी साठ हजार पेट्या आल्या आहेत तर इतर ठिकाणाहून आंब्याचे ३५ हजार कॅरेट आले आहेत. मात्र कोकणातील हापूस आंब्याची आवक कमीच असल्याने याचाच फायदा घेत बाजारातील काही व्यापारी कोकणातील हापूसच्या नावाने इतर जातीच्या आंब्याची विक्री करताना दिसत आहेत. केरळ कर्नाटक मधून येणारा आंबा हा कोकणातील हापूस आंब्यासारखाच दिसायला आहे. याबाबत एपीएमसी प्रशासन दक्ष झाले आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे राजीव कोंडे यांनी सांगितले.**

## नेरूळमध्ये रंगणार माझे गाव सांस्कृतिक सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार , प्रतिनिधी**



परीक्षेचा निकाल आणि अभ्यासाचा ताण यातून विद्यार्थ्यांना काही काळ मोकळा श्वास घेता यावा, या उद्देशाने नेरूळ येथील 'एन. आर. बी. एज्युकेशनल सोशल आणि कल्चरल ट्रस्ट'तर्फे 'माझे गाव' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी आपल्या गावाची परंपरा आणि महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती मोठ्या उत्साहात सादर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

शालेय परीक्षा संपल्यानंतर अनेक मुले सुट्टीत आपल्या गावी जातात, मात्र जे विद्यार्थी शहरातच थांबतात त्यांना आपल्या मूळ गावाची ओढ असते. हीच उणीव भरून काढण्यासाठी ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

माझं गाव या कार्यक्रमाची पूर्वतयारी आणि विद्यार्थी मार्गदर्शन सत्र दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी येणारे एज्युकेशनल ट्रस्टच्या विद्या संकुलात आयोजित करण्यात आले होते.यावेळी बोलताना नामदेव भगत म्हणाले की, "प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या संस्कृतीशी जोडलेले असणे आवश्यक आहे. कलेच्या माध्यमातून स्वतःचे गाव सादर केल्याने मुलांमधील आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना आपल्या मुळांची ओळख होते. जे विद्यार्थी गावी जाऊ शकले नाहीत, त्यांना या उपक्रमामुळे शाळेतच 'गाव' अनुभवता येईल."

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या गावाचे वैशिष्ट्य दर्शवणारी छोटी गीते, लोककला आणि नाट्यप्रसंग सादर करू शकतात. वेशभूषा आणि बोलीभाषेच्या वापरामुळे जणू काही शाळेच्या आवारात छोटेखानी महाराष्ट्रच शाळेत अवतरणार आहे.

या प्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता कोठेकर, वंदना पाटील तसेच शिक्षक प्रदीप खिस्ते, शेखर जगताप, आव्हाड रंजना साळुंखे, पूर्व ठाकरे, सुनंदा नवकुडकर, सुगंधा घुले, वृषाली परदेशी,काळुराम जाधव आणि निराशा मोकल आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# सोसायटी आदिवासीवाडीचा वनवास संपणार

## भाजपच्या पाठपुराव्यातून साकारतोय काँक्रीटचा पक्का रस्ता

**पाली : प्रतिनिधी**

पाली नगरपंचायत अंतर्गत असलेल्या सोसायटी आदिवासीवाडी येथील नागरिकांचा अनेक वर्षांचा रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. नगरसेविका जुईली ठोंबरे आणि भाजप सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या दुर्गम भागात आता काँक्रीटचा पक्का रस्ता साकारत असून वाडीतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यानिमित्ताने निवडणुकीत दिलेला शब्द आणि जनतेने टाकलेला विश्वास या दोन्ही गोष्टींची पूर्तता करण्यात आली आहे.

सोसायटी आदिवासीवाडी येथे यापूर्वी साधा पायमार्गही उपलब्ध नव्हता. विशेषतः पावसाळ्यात येथील नागरिकांचे प्रचंड हाल होत असत. एखादी व्यक्ती आजारी पडल्यास झोळीत घालून मुख्य रस्त्यापर्यंत न्यावे लागायचे. ही बिकट परिस्थिती



पाहून ठोंबरे यांनी हा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचा विडा उचलला होता. पक्का रस्ता करण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती, मात्र स्थानिक शेतकऱ्यांनी संवेदनशीलतेचे दर्शन घडवत प्रत्येकी पाच फूट जागा रस्त्यासाठी दान केली.

या सहकार्यामुळे सुरुवातीला पाच लाख रुपये खर्चून माती भराव व खडीकरण करण्यात आले. आता याच ठिकाणी २० लाख रुपयांच्या निधीतून डांबरीकरणाचा पक्का रस्ता तयार होत आहे. या विकासकामात पाली नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

**सोसायटी आदिवासीवाडीतील माता-भगिनी आणि आजारी व्यक्तींना झोळीतून प्रवास करताना पाहणे अत्यंत क्लेशदायक होते. आम्ही निवडणुकीत जो शब्द दिला होता, तो आज पूर्ण होताना पाहून मनाला मोठे समाधान वाटत आहे. हा रस्ता येथील आदिवासी बांधवांच्या प्रगतीचा मार्ग आहे. विकासाच्या या प्रक्रियेत जागा देणाऱ्या दानशूर शेतकऱ्यांचे आणि सहकार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे मी आभार मानतो. लोकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे आणि ती आम्ही सदैव जपू.**
**-श्रीकांत ठोंबरे, अध्यक्ष,**
भाजप सुधागड तालुका अध्यक्ष

# कोंबड्यांच्या खुराड्यात अजगर शिरला; सर्पमित्रांकडून रेस्क्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील हाळ बुद्रुक गावात गुरुवारी (दि.२३) पहाटे एक थरारक घटना घडली. येथील रहिवासी अमजद सोंडे हे घरालगत गावठी कोंबड्या आणि बकऱ्या पाळतात. पहाटेच्या सुमारास त्यांना कोंबड्यांच्या खुराड्यात काहीतरी संशयास्पद हालचाल जाणवली. जवळ जाऊन पाहिले असता अंदाजे सहा फुटी अजगर कोंबड्यांवर हल्ला करण्याच्या तयारीत दबा धरून बसलेला दिसून आला.

अमजद सोंडे यांनी तत्काळ हेल्प फाउंडेशनचे सर्पमित्र अमोल ठकेकर यांच्याशी संपर्क साधला. ठकेकर आणि गुरुनाथ साठेलकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव



### खोपोलीजवळील हाळ बुद्रुक येथील घटना

घेत अत्यंत कौशल्याने आणि कोणतीही हानी न करता त्यांनी त्या अजगराला सुरक्षितरीत्या जेरबंद केले.

विशेष म्हणजे यापूर्वीही या भागात मुंगूस, अजगर तसेच घोणस जातीचे साप कोंबड्यांच्या पिंजऱ्यात अडकण्याच्या घटना घडल्या आहेत. प्रत्येक वेळी हेल्प फाउंडेशनच्या सर्पमित्रांनी तत्परतेने मदत करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.


अजगर पकडण्यात आल्यानंतर बराच वेळ दहशतीखाली असलेल्या कोंबड्यांचा कलकलाट थांबला. या कामगिरीबद्दल अमजद सोंडे यांनी हेल्प फाउंडेशनचे आभार मानले.

# ‘एल निनो’च्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाची सज्जता

**रायगड : रामप्रहर वत्त**

राज्यात वाढत्या तापमानाची शक्यता व उष्णलहरींचा धोका लक्षात घेता पशुसंवर्धन विभागाने राज्यातील पशुपालक, कुक्कुटपालक व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पशुधनावर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी विभागाने सर्व पशुवैद्यकीय संस्थांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असून पशुपालकांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

उष्णलहरींच्या काळात पशुधनाची कशी काळजी घ्यावी व याबाबत क्षेत्रिय स्तरावर काय जनजागृती करण्यात यावी याबाबत पशुसंवर्धन विभागाने मार्गदर्शक सूचनांच्या माध्यमातून अधिनस्त संस्थाप्रमुखांना अवगत केले आहे तसेच पशुपालकांना मार्गदर्शक सूचनांच्या माध्यमातून पशुधनाची काळजी घेण्याबाबत आवाहन केले आहे. यामध्ये पशुधनाला पुरेसे स्वच्छ आणि थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. आहारात क्षार मिश्रणे व जीवनसत्वांचा समावेश करावा. दुभत्या जनावरांना संतुलित आहार द्यावा. शेतीच्या किंवा वहनाच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या पशुधनाला सकाळी ११ ते सायंकाळी ४ या तीव्र उन्हाच्या काळात विश्रांती द्यावी. त्यांना सावलीत किंवा खेळती हवा असलेल्या थंड जागी बांधावे. गोठ्याचे छत उष्णता रोधक असावे किंवा छतावर गवत/पालापाचोळा टाकून त्यावर पाणी मारावे. शक्य असल्यास स्प्रिंकलरचा वापर करावा. खिडक्यांना सावलीची व्यवस्था असावी. उष्णलहरी सुरू होण्यापूर्वी घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार यांसारख्या रोगांचे प्रतिबंधक



लसीकरण व जंतनाशक औषधे पाजणे आवश्यक आहे.

पशुसंवर्धन विभागाने सर्व क्षेत्रीय संस्थांना हवामान विभागाच्या संपर्कात राहून दैनंदिन तापमानाचा अंदाज घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व दवाखान्यांमध्ये आवश्यक जीवरक्षक औषधे, व औषधी साठा आवश्यक प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आला आहे. फिरती पशुवैद्यकीय पथके तातडीच्या सेवेसाठी तैनात ठेवण्यात आली आहेत.

पशुसंवर्धन विभागाने जिल्हा प्रशासन, अशासकीय संस्था, तसेच सामाजिक-सेवाभावी संस्थांना आवाहन केले आहे की, रस्त्यावरील पशू-पक्ष्यांसाठी घराबाहेर किंवा सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची भांडी/हौद ठेवावेत. मृत पशुधनाची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने लावण्यासाठी स्थानिक प्रशासनाने योग्य जागा आरक्षित ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

उष्णलहरींच्या काळात पशुधनासाठी नेहमी स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची सोय करावी. पिण्याची भांडी नियमित स्वच्छ ठेवावीत. पिण्याचे पाण्याचे हौद शक्यतो गोठ्याजवळ व सावलीत असावेत. नसल्यास त्यावर शेड उभारून थेट उन्हापासून संरक्षण करावे. चारा, वैरण व पशुखाद्याचा पुरेसा साठा करून ठेवावा. खाद्यात मिनरल मिक्श्चरचा समावेश करावा. उत्पादक व दुभत्या पशुधनास संतुलित आहार द्यावा. गाभण पशुधनाच्या खाद्य व चाऱ्याची काळजी घ्यावी. आधुनिक गोठ्यांमध्ये 'स्प्रिंकलर' वापरावेत. इतर पशुपालकांनी पशुधनाच्या अंगावर पाणी फवारावे. म्हशींना शक्य असल्यास स्वच्छ पाण्याच्या हौदात बसण्याची सोय करावी.सायंकाळच्या दूध दोहनाची वेळ टप्प्याटप्प्याने किमान एक तास उशिरा ठेवावी, जेणेकरून उष्णतेचा ताण कमी होऊन उत्पादन टिकून राहील. पशुधनाला सावलीत व भरपूर खेळती हवा असलेल्या जागी बांधावे. निवाऱ्याच्या छतासाठी उष्णता रोधक साहित्याचा वापर करावा.पक्षीगृहाच्या छतावर गवताचे आच्छादन करावे. जाळ्यांना पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे व हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. शेती किंवा ओझे वाहणाऱ्या पशुधनाला सकाळी ११ ते दुपारी ४ या तीव्र उन्हाच्या काळात पूर्ण विश्रांती द्यावी. उष्णतेपासून वाचवण्यासाठी अश्वाला त्याच्या पायाकडून शरीराच्या वरील भागाकडे थंड पाण्याचा हळुवार शिडकावा करावा. वराहांना पुरेसा निवारा, स्वच्छ पाणी व शक्य असल्यास पाण्यात बसण्याची सोय करावी. पाळीव प्राणी/पशूंना उन्हाच्या वेळी शक्यतो घरात किंवा सुरक्षित निवाऱ्यात ठेवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### तातडीच्या उपाययोजना आणि उपचार

पशुधनामध्ये उष्माघाताची लक्षणे (उदा. धापा टाकणे, तोंडावाटे लाळ गळणे, अस्वस्थता) दिसून आल्यास त्वरित तत्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. पशुधनावर थंड पाण्याचा मारा करावा. (अश्ववर्गीय प्राण्यांच्या बाबतीत पायाकडून शरीराच्या वरील भागाकडे पाणी मारावे). जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.

# नागोठण्यातील जीर्ण कमान जमीनदोस्त

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे हायवेवरून रिलायन्स कंपनीकडे जाणाऱ्या मार्गावरील हजरत मिरा मोहद्दीन शाहबाबा यांच्या नावाने उभारलेली कमान अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ती जमीनदोस्त करण्यात आल्याची माहिती नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अकलाख पानसरे यांनी दिली. यावेळी नागोठण्याचे पहिले लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक उपस्थित होते.

सदर कमान २००८ साली तत्कालीन सरपंच विलास चौलकर यांच्या कार्यकाळात बांधण्यात आली होती, मात्र कालांतराने कमानीला मोठे तडे गेले होते तसेच



अक्षरे पुसली गेली आणि एकूणच रचना धोकादायक बनली होती. एप्रिलच्या सुरुवातीला एका अज्ञात ट्रकच्या धडकेमुळे स्थिती आणखी गंभीर झाली होती.

या संदर्भात रोहा पंचायत समितीकडे कमान तोडण्याबाबत अर्ज करण्यात आला होता, मात्र परवानगीसाठी दोन ते तीन महिने लागण्याची शक्यता असल्याने तातडीचा धोका लक्षात घेऊन निर्णय घेण्यात आला.

विशेष म्हणजे ५ व ६ एप्रिल रोजी नागोठण्यात होणाऱ्या प्रसिद्ध उरुसासाठी हजारो भाविक या मार्गाने ये-जा करणार होते. अशा वेळी कमान कोसळल्यास मोठी जीवितहानी होऊ शकली असती. हीच बाब लक्षात घेऊन तातडीने कारवाई करण्यात आल्याचे पानसरे यांनी स्पष्ट केले. रिलायन्स व्यवस्थापनाला नव्याने मजबूत व सुसज्ज कमान उभारण्याच्या सूचना केल्याचेही सांगण्यात आले.

## रानवडेत मंदिर वर्धापन दिन

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील रानवडे येथील वरद विनायक मंदिराचा ४८वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात झाला.

ग्रामविकास मंडळ यांच्या वतीने सद्गुरू शंकरमहाराज दगडे (अंदोरी), पांडुरंगमहाराज सुतार (महाड), गुरुमाता सुनीती पांडुरंग सुतार, गुरुवर्य हभप राजीव सुतार (महाड) यांच्या कृपाशीर्वादाने विविध कार्यक्रम झाले. यासाठी गावचे अध्यक्ष चंद्रकांत आंबेकर, संचालक दत्ताराम पाते, रामभाऊ चिमण, पोलीस पाटील संतोष आंबेकर, मुंबई मंडळाचे अध्यक्ष जतिन चिमण, सूर्यकांत मोरे, संचालक महादेव पाते, पुरुषोत्तम चिमण, अजय गावडे, मनीष चिंचाळकर आदींनी मेहनत घेतली.

# कौशल्य विकास कार्यशाळेच्या ३२० लाभार्थ्यांना टूलकिट, प्रमाणपत्राचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड, नांदी व लोरियल फाउंडेशन सी.एस.आर प्रोजेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील ब्युटी पार्लर या कौशल्य विकास उपक्रमात सहभागी साधन व्यक्ती, विद्यार्थी व कर्मचारी यांच्याकरिता नांदी व लोरियल फाउंडेशन सी.एस.आर प्रोजेक्ट द्वारा रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून ३२० विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात आले. व त्यातील २६४ यशस्वी लाभार्थ्यांना "ब्युटी फॉर बेटर लाइफ" या १३ दिवसीय कौशल्यवृध्दी व क्षमता बांधणी कार्यशाळेचे मोफत टूलकिट व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या, अध्यक्ष डॉ नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर,संचालक डॉ. विजय कोकणे, बी.एम.व्ही ट्रस्टच्या अध्यक्ष रत्ना जोशी व राजवर्धन जोशी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. प्रकाश यादव, डॉ. पूजा भालेराव, प्रतिनिधी सौरभ आंबीलपुरे, नंदी



फाउंडेशनच्या समन्वयक प्रज्ञा अग्रवाल, आरती पांडे, जन शिक्षण संस्थान रायगडचे बोर्ड मेंबर नरेन जाधव, चार्टर्ड अकाउंटंट संजय राऊत आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. मेधा सोमय्या यांनी, आत्मनिर्भर भारतासाठी अशा प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले. जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, अशी सूचना रत्ना जोशी यांनी केली. जेएसएस रायगड, नांदी व लोरियल फाउंडेशन सी.एस.आर प्रोजेक्टमुळे आत्मनिर्भर भारत संकल्पनेला प्रेरणा दिली जात असल्याचे मत नांदी व लोरियल फाउंडेशन सी.एस.आर प्रोजेक्टच्या समन्वयक प्रज्ञा अग्रवाल यांनी व्यक्त केले. साधारणपणे २५ हजार रुपये प्रति व्यक्ती किमतीचे एकूण ६६ लाख रुपये किमतीचे टूलकिट आम्ही २६४ विद्यार्थ्यांना जेएसएस रायगडच्या सहकार्यातून देऊ शकलो याचा आम्हाला आनंद वाटतो, असेही त्या म्हणाल्या. विनामूल्य मिळालेल्या साहित्य साधनांची किंमत वाढवायची असेल तर परिश्रमातून उद्योग उभा करा, असे मत चार्टर्ड अकाउंटंट संजय राऊत यांनी व्यक्त केले.

# मध्य रेल्वेने विविध कार्यक्रमांसह साजरा केला जागतिक वारसा दिन





**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने जागतिक वारसा दिन-२०२६ मोठ्या उत्साहात साजरा केला. हा कार्यक्रम युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ व मध्य रेल्वेचे मुख्यालय आणि भारतीय रेल्वेचा अभिमान असलेल्या तसेच गेल्या १३८ वर्षांपासून दिमाखाने उभे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे साजरा झाला. सांस्कृतिक वारशाचे महत्त्व आणि त्याच्या जतनाची गरज याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉन्युमेंट्स अँड साइट्स (ICOMOS)ने दरवर्षी १८ एप्रिल रोजी जागतिक वारसा दिनाची सुरुवात केली. ICOMOSने प्रस्तावित केल्यानुसार २०२६ची संकल्पना “संघर्ष आणि आपत्तींच्या संदर्भात अस्तित्वातील वारशासाठी आपत्कालीन प्रतिसाद” ही आहे.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी यांनी, प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता सुबोध कुमार सागर आणि मुख्यालय व मुंबई विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ‘हेरिटेज वॉक’चे नेतृत्व केले. या पदयात्रेत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या स्थापत्यकलेतील भव्यतेवर प्रकाश टाकण्यात आला आणि भारतीय रेल्वेच्या समृद्ध वारशाचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांतील लोक, नागरी संरक्षण दलाचे सदस्य, स्काऊट्स अँड गाईड्स आणि मोठ्या संख्येने रेल्वे कर्मचारी यांनीही या पदयात्रेत सक्रियपणे सहभाग घेतला.

हेरिटेज वॉकची सुरुवात मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १४ आणि १५च्या दरम्यान असलेल्या हेरिटेज सहयोगीमधील प्रदर्शनाला भेट देऊन झाली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इमारतीची स्थापत्यकलेतील अद्भूतता दर्शवणारे डिस्प्ले बोर्ड, रेल्वेस्थानके, रेल्वे पूल आणि नेरळ-माथेरान रेल्वेवरील लघुपट तसेच जुन्या रेल्वे इंजिन आणि डब्यांच्या प्रतिकृतींसह विविध प्रदर्शने होती. हेरिटेज गॅलरीच्या भिंती महाराष्ट्रातील रेल्वे, ऐतिहासिक इमारती आणि पर्यटनस्थळांच्या छायाचित्रांनी सजवल्या होत्या. या प्रदर्शनात पूर्णपणे रेल्वेच्या निरुपयोगी टाकाऊ सामानापासून बनवलेला महात्मा गांधींचा पुतळाही होता. ‘हेरिटेज वॉक’मध्ये हेरिटेज संग्रहालय आणि स्टार चेंबरलाही भेट देण्याचा समावेश होता.

अतिरिक्त महाव्यवस्थापकांनी अधिकारी, रेल्वे कर्मचारी आणि उपस्थित असलेल्या सर्वांना वारसा रेल्वे स्थानके, लोकोमोटिव्ह यांचे संरक्षण करण्याची, रेल्वे वारशाबद्दल जागरूकता वाढवण्याची आणि वारसा संवर्धनाची भावना जपण्याची शपथ दिली.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जागतिक वारसा दिनाच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या वारसा इमारतीला रोषणाई करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे. ही एक स्थापत्यशास्त्रीय अद्भूत वास्तू आहे. ब्रिटिश अभियंता फ्रेडरिक विल्यम स्टीव्हन्स यांनी डिझाइन केलेली ही इमारत इंडो-गॉथिक स्थापत्यकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. याचे बांधकाम १८७८मध्ये सुरू झाले आणि १८८८मध्ये ₹१६,१३,८६३च्या खर्चाने पूर्ण झाले. ही इमारत व्हिक्टोरियन गॉथिक रिवाइव्हल शैलीला मुघल आणि पारंपरिक भारतीय स्थापत्यकलेच्या घटकांसह जोडते, जे भारताच्या समृद्ध आणि विविध वारशाचे प्रतीक आहे.

भारतातील सर्वात जुन्या अस्तित्वात असलेल्या रेल्वे स्थानकांपैकी एक असलेले भायखळा स्टेशन १६ एप्रिल १८५३ रोजी बोरीबंदर ते ठाणे या पहिल्या ऐतिहासिक रेल्वे प्रवासाचा एक भाग होते. आता १७३ वर्षे जुने असलेले हे स्टेशन त्याच्या मूळ गॉथिक वास्तुकलेच्या वैभवात अत्यंत काळजीपूर्वक पुनर्संचयित करण्यात आले आहे आणि त्याचे मोठ्या काळजीने जतन केले जात आहे.

११९ वर्षे जुनी वारसा रेल्वे लाईन, नेरळ-माथेरान लाईट रेल्वे, १९०७मध्ये सुरू झाली. ही निसर्गरम्य नॅरो-गेज रेल्वे प्रौढ, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक आनंददायी अनुभव आहे. ही रेल्वे प्रवाशांना घनदाट जंगले आणि डोंगराळ प्रदेशातून एक अनोखा प्रवास घडवते तसेच जुन्या रेल्वे प्रवासाचे आकर्षण जपते.

जागतिक वारसा दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये आणि कार्यशाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मध्य रेल्वे, प्रगतीशील भविष्यासाठी आधुनिकीकरण आणि नवनिर्मितीचा स्वीकार करत भारतीय रेल्वेचा वारसा जपण्यासाठी दृढपणे वचनबद्ध आहे, असे यानिमित्ताने अधोरेखित करण्यात आले.

स्थापना-२०१६

# पनवेल महानगरपालिका




## नागरिकांच्या सोयीसाठी आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने **एक मोठे पाऊल**

स्मार्ट डिजिटल सुविधा आता आपल्या सेवेत उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक जलद, सोपी आणि सर्वांसाठी सुलभ करण्याचा हा उपक्रम आहे.

KarMitra
CHAT · PAY · RELAX

### करमित्र (KARMITRA)

**तुमचा विश्वासू डिजिटल साथीदार**

करमित्र चॅटबॉटद्वारे तुम्ही घरबसल्या मालमत्ता करासबंधी, विविध सेवांबाबत माहिती विचारू शकता तसेच तत्काळ कर भरणा करू शकता. **हा चॅटबॉट 24 x 7 उपलब्ध असून नागरिकांना वेळेची मोठी बचत करून देतो.**

whatsaap चॅटबॉट No. 8956891145



### किऑस्क मशीन

(KIOSK MACHINE)

**झटपट आणि सुलभ पेमेंट सुविधा**

कर भरण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी आणि जलद झाली आहे. प्रभाग कार्यालयांमध्ये उपलब्ध किऑस्क मशीनद्वारे नागरिकांना QR कोड स्कॅन करून किंवा मोबाईल नंबर टाकून काही क्षणांतच पेमेंट करू शकतात. **रांगांपासून मुक्तता, वेळेची बचत आणि सुरक्षित व्यवहार - हे या सुविधेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.**

### प्रॉपर्टी पासबुक

(PROPERTY PASSBOOK)

**पूर्ण पारदर्शकता तुमच्या हातात**

मालमत्तेशी संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर मिळवण्याची सुविधा आता उपलब्ध आहे. डिमांड, कलेक्शन, बाकी रक्कम, मालमत्तेतील बदल आणि व्यवहारांचा संपूर्ण तपशील सहज पाहता येतो. यामुळे **नागरिकांना त्यांच्या कर स्थितीची स्पष्ट आणि अद्ययावत माहिती मिळते.**

**ही सर्व डिजिटल साधने नागरिकांना अधिक सक्षम बनवण्यासाठी आणि प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.**

## डिजिटल सुविधा - स्मार्ट नागरिक, स्मार्ट शहर!

## मालमत्ता कर विभाग

# आजच भरणा करुन सवलतीचा लाभ घ्या!

आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर देयके वितरीत करण्याचे कार्य सुरु आहे.

**३१ मे २०२६ पर्यंत करांचा भरणा केल्यास चालू मागणीवर तब्बल ५% सूट मिळवा!**

ऑनलाईन भरणा करुन अतिरिक्त **२% सूट मिळवा.**

KarMitra
CHAT · PAY · RELAX

PANVEL CONNECT

मालमत्ता कर भरणा करण्यासाठी
**Karmitra PMC & Panvel Connect App**
डाउनलोड करा

@pmc_panvel @pmc_panvel

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२६/प्र.क्र.११७/१२८/२०२६